दैनिक

# समर्थ राजयोग

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ५ वे अंक –२०९ बुधवार,दि.०२ एप्रिल २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-5th Issue-209 Wednesday, Dt.02 April 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# पालकमंत्री अजित दादा पवारांनी येण्यापूर्वीच बीडला विमानतळ मंजूर केले!



## आ.सुरेश धसांच्या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी मान्यता देत ६० कोटी रुपयांच्या जलसंपदा कामांना मंजुरी दिली !!

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचा जिव्हाळ्याचा अहमदनगर बीड परळी रेल्वे प्रश्न जवळपास मार्गी लावण्यात आला आहे.इतकेच नव्हे तर सोलापूर बीड जळगाव या नव्या रेल्वे मार्गा संदर्भात सरकारने घोषणा देखील केली आहे. बीडचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी तर बीडला थेट नवीन विमानतळाची केवळ घोषणाच नाही तर प्रशासकीय मान्यताच दिली आहे.आता आ सुरेश धस यांच्या मागणीनुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीड जिल्ह्यातील ब्रम्हनाथ येळंब येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधा–यांचे बॅरेजमध्ये रुपांतरणास १७.३० कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास तर टाकळगांव हिंगणी कोल्हापूर पद्धतीच्या बंधा–यांच्या बॅरेजमध्ये रुपांतरणास १९ कोटी ६६ लाख रुपयांच्या खर्चास आणि निमगांव बंधा–याचे बॅरेजमध्ये रुपांतरणास २२ कोटी ८ लाख रुपायांच्या कामांना आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली.जवळपास ६० कोटी रुपयांच्या जलसंधारण कामांना मंजुरी दिल्याने भविष्यात या भागातील शेतकऱ्यांच्या जीवनात नंदनवन फुलणार आहे. बीड जिल्ह्याचे मागासलेपण दूर करण्यासाठी पालकमंत्री अजित दादा पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच आता लक्ष घातल्याने आता बीडचा विकास कागदावर नव्हे तर प्रत्यक्षात होणार अशी अपेक्षा करण्यास हरकत नाही हे निश्चित.

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्ह्यातील तीन प्रकल्पांना जवळपास ६० कोटी रुपये मंजूर केले आहेत. यामध्ये प्रामुख्याने बीड जिल्ह्यातील सिंदफणा नदीवरील ब्रम्हनाथ येळंब कोल्हापूर पध्दतीच्या बंधारे प्रकल्पाचे बॅरेजमध्ये रुपांतरीत करण्याच्या कामास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

बीड जिल्ह्यातील सिंदफणा नदीवर सुमारे ३० ते ३५ वर्षापूर्वी बांधलेले ब्रम्हनाथ येळंब कोल्हापूर पद्धतीचा बंधारा नादुरुस्त होता . पूर परिस्थितीत सदर कोल्हापूर पद्धतीचे बंधा–याचे गेट्स काढणे जिकिरीचे होत असल्याने पूर नियंत्रण करताना अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर सदर कोल्हापूर पद्धतीच्या बंधा–याचे रुपांतरण बॅरेजमध्ये करण्यास शासनाने मे २०२२ मध्ये तत्वत: मान्यता दिली आहे. त्याअनुषंगाने प्रकल्पीय पाणीसाठा व

(उर्वरीत पान २ वर)

### अजित दादांनी साधला राजकीय समतोल

बीड जिल्ह्यातील अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात देखील मोठ्या प्रमाणात गट तट आहेत.माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे ग्रहमान फिरल्यामुळे मुंडे विरोधक देखील आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मोठ्या प्रमाणात सक्रिय होण्यास सुरुवात झाली आहे. अजितदादांनी आजच्या दौऱ्यामध्ये मुंडे समर्थक आणि मुंडे विरोधक तसेच डॉक्टर योगेश क्षीरसागर समर्थक आणि क्षीरसागर विरोधक या सर्वांनाच राजकीय दृष्टिकोनातून सांभाळण्याचा प्रयत्न केला आहे.त्यांनी सर्वांनाच स्वतंत्र वेळ देऊन राजकीय ताकद देण्याचा प्रयत्न केला आहे.अजितदादा पालकमंत्री झाल्यानंतर आज पहिल्यांदाच बीडमध्ये तब्बल १३ घंटे विविध कार्यक्रमांना उपस्थित राहून जिल्हाधिकारी कार्यालयात विविध विभागांच्या विकासात्मक कामासंदर्भात बैठका सुद्धा घेणार आहेत. सांत्वनपर भेट देखील त्यांच्या दौऱ्यात आहे. त्याच बरोबर ते पत्रकार परिषद सुद्धा घेणार आहेत.त्यामुळे आज बीड शहरातील वातावरण रखरखत्या उन्हात सुद्धा दादांच्या आगमनामुळे गुलाबी झाले आहे.

## बीडमध्ये शिवसेनेची उद्या आढावा बैठक : जगताप, मुळूक, गलधर





### शिवसेना सदस्य नोंदणीचा होणार शुभारंभ

बीड ।प्रतिनिधी

शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब,खासदार श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशाने शिवसेना सचिव संजय मोरे साहेब, शिवसेना उपनेते मराठवाडा संपर्कप्रमुख अर्जुन भाऊ खोतकर साहेब व शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब यांच्या सूचनेवरून बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या उपस्थितीत उद्या ३ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता हनुमान मंदिर ,माळीवेस चौक बीड येथे शिवसेनेची आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत शिवसेना

(उर्वरीत पान २ वर)

## शिरूर, गेवराई तालुक्याला ना. पंकजाताई मुंडे यांनी दिलं विकासाचं गिफ्ट!



### सिंदफणा नदीवरील निमगाव कोल्हापूरी बंधाऱ्याच्या विस्तारासाठी २२ कोटीच्या निधीला कॅबिनेटची मान्यता


### ब्रह्मनाथ येळंब, टाकळगाव हिंगणी साठी देखील मिळाले ३७ कोटी

बीड ।प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज शिरूर कासार आणि गेवराई तालुक्याला विकासाचं गिफ्ट दिलं आहे. शिरूर तालुक्यातील सिंदफणा नदीवरील निमगाव कोल्हापूरी बंधाऱ्याच्या विस्तारासाठी २२ कोटी तर ब्रह्मनाथ येळंब व टाकळगाव हिंगणी (गेवराई) येथील बंधाऱ्यासाठी ३७ कोटी रूपये निधीला राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. (उर्वरीत पान २ वर)

## सोसाटयाच्या वारयाने नवटके यांच्या शेतातील सोलर प्लांट चे भारी नुकसान

### अनेक झाड़े उन्मळून पडली, पिकांचेही नुकसान



डॉ आशिष तिवारी/मंठा

तालुक्यातील टोकवाडी येथे दि एक एप्रिल २०२५ मंगळवार रोजी सकाळी खूप सुसाट वारे वाहू लागले आणि या वाऱ्यामध्ये बऱ्याचश्या शेतकऱ्यांच्या शेतातील झाडे उन्मळून पडली आणि या झाडांच्या फांद्या

(उर्वरीत पान २ वर)

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम

बीड ।प्रतिनिधी

राज्याचे मा. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार उद्या दिनांक २ एप्रिल २०२५ रोजी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे त्यांचा बीड जिल्हा दौरा पुढीलप्रमाणे आहे. बुधवार दि. २ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ७.०० वाजता छत्रपती संभाजीनगर विमानतळ येथे आगमन. सकाळी ७.१५ वाजता हेलिकॉप्टरने बीडकडे प्रयाण. सकाळी ७.५५ वाजता पोलीस परेड ग्राऊंड येथील हेलीपॅड पोलीस मुख्यालय, बीड येथे आगमन. सकाळी ८.१० वाजता डॉ. योगेश क्षिरसागर यांच्या निवासस्थानी नगर रोड, बीड येथे आगमन. सकाळी ८.१० वाजता राखीव. सकाळी ८.३५ वाजता राष्ट्रवादी भवन कार्यालय, मित्र नगर, बीड येथे आगमन. सकाळी ८.३५ वाजता पदाधिकारी कार्यकर्ते व अभ्यागतांच्या भेटीसाठी राखीव.सकाळी ९.४५ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह



बीड येथे आगमन. सकाळी ९.४५ वाजता राष्ट्रवादी युवक काँग्रेस मेळावा. नंतर सकाळी १०.५० वाजता सुराज्य नगर, बार्शी रोड, बीड येथे आगमन.

सकाळी १०.५० वाजता प्रा. सुशिलाताई मोराळे यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट. नंतर सकाळी ११.१५ वाजता खासबाग शासकीय रोप वाटीकेसमोर, शहिंशाह नगर, बीड येथे आगमन. सकाळी ११.१५ राखीव . सकाळी ११.४५ वाजता जय हिंद सॉ–मिल सुभाष रोड योथे आगमन. सकाळी ११.४५ वाजता राखीव.दुपारनंतर १२.४५ वाजता श्री. अमरसिंह पंडित माजी आमदार यांच्या निवासस्थानी, शिवछत्र, सुभाषरोड बीड येथे आगमन. दुपारी १२.४५ वाजता राखीव. दुपारी १.५५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आगमन. दुपारी २.०० वाजता बीड जिल्ह्यातील विविध विकासकामे तथा योजनांची जिल्हास्तरीय आढावा बैठक. सायं ४.०० वाजता जिल्हास्तरीय समितीची बैठक. सायं. ५.०० वाजता पत्रकार परिषद. सायं. ५.४५ वाजता ऑलिव्ह व्हेज रेस्टॉरंट, नगर रोड, बीड येथे आगमन व उद्घाटन. सायं. ६.१० वाजता लोकाशा भवन मोंढा रोड ,बीड येथे आगमन व दै. लोकाशा महोत्सव कार्यक्रम व ७.३० राखीव. रात्री ८.१५ वाजता मोटारीने छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण

## मराठी अभिनेते सयाजी शिंदे यांनी घेतली सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट

अनंत जाधव/मस्साजोग

मराठी सिनेअभिनेते सयाजी शिंदे यांनी मस्साजोगला जात दिनांक १ एप्रिल मंगळवार रोजी १२ वाजता सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटूबियाची भेट घेतली आणि सरपंच संतोष देशमुख यांचे बंधु धनंजय देशमुख याच्याशी संबधित प्रकरणाविषयी चर्चा केली.याप्रसंगी प्रसार माध्यमांशी संवाद साधतांना सयाजी शिंदे म्हणाले आम्ही देशमुख कुटुंबिया सोबत आहोत, देशमुख कुटुंबाची काळजी होती म्हणून भेट घेतली देशमुख कुटुंबाची काळजी होती

### जो रोज रोज मारला जातोय. तो रोज रोज कसा जिवंत राहिल याचा विचार आम्ही करत आहोत – सयाजी शिंदे




म्हणून आज मी त्यांची भेट घेतली. सांत्वन केलं न्यायाच्या गोष्टी होत राहतील लवकर होतील यापेक्षा ठेवू त्या पलीकडे आम्ही विचार करतोय संतोषचा चांगुल पण कसा टिकवायचा यासाठी विचार करत आहोत.

एक माणूस एकदा मरतो आणि पण हा आत्मा असा आहे जो रोज रोज मारला जातोय.

(उर्वरीत पान २ वर)




## जिल्हा वाहतुक शाखेचा वैधनाथाच्या नगरीत नियम मोडणार्या वाहनधारकांना दणका

### ९५ केसेस व ६६ हजार रुपयाचा ठोठावला दंड

चोरीचे वाहन संभाजीनगर पोलीस स्टेशनला जमा

बीड ।प्रतिनिधी

जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शन आणि जिल्हा वाहतुक शाखेची कटाक्ष नजर यामुळे वाहन चोरी करणार्या आरोपींचे चांगलेच धाबे दणाणले आहे. अशातच परळी वै.येथे वर्षभरापुर्वी चोरीला गेलेले वाहन तपासणीदरम्यान चोरीचे आढळून आल्याने संबंधित आरोपीस वाहनासह पकडून कारवाई करण्यात आली त्यामुळे नागरिकांतून पोलीसांच्या कामांविषयी समाधान व्यक्त केले जात आहे

याबाबत माहिती अशी की, बीड जिल्ह्यात सद्यस्थितीला पोलीस अधिक्षक नवनीत सर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हेगारांचे कंबरडे मोडले असून यापुर्वी २४ तासाच्या आत गुन्हेगारांवर भारतीय न्याय संहिते अंतुर्गत कायदेशीर कारवाई

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# वचननाम्याला गळती! अंथरूण पाहून पाय पसरण्याचा साक्षात्कार

निवडणुकीच्या काळात मुक्त हस्ताने दिलेल्या आश्वासनांमधून गळ्यात पडलेल्या विजयाच्या हारतुऱ्यांचे आता पाश बनल्याचा अनुभव महायुतीच्या नेत्यांना येत आहे. लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींना दरमहा २१०० रुपये देण्याच्या विषयातून राज्य सरकारने नुकतीच 'सन्मानजनक' माघार घेतली; तीच वेळ शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत आली आहे. 'सध्या राज्याची आर्थिक स्थिती पाहता कर्जमाफी शक्य नाही, इतकेच नव्हे तर पुढील तीन वर्षे कर्जमाफी करता येणार नाही,' असे अर्थ खात्याची जबाबदारी पाहणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगून टाकले. पवार हे स्पष्ट आणि सडेतोड बोलण्यासाठी प्रसिद्ध आहेत. फक्त निवडणुकीपूर्वी त्यांचा हा सडेतोड बाणा कुठे हरवतो, हा प्रश्न आहे. निवडणुकीपूर्वी राज्यात त्यांचेच सरकार होते.

महायुतीच्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यात लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये देण्यापाठोपाठ शेतकरी कर्जमाफी, शेतकरी सन्माननिधीची रक्कम १५ हजार रुपये आणि किमान आधारभूत किमतीवर (एमएसपी) २० टक्के अनुदान, हे दुसऱ्या क्रमांकाचे आश्वासन आहे. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या त्रयीच्या छायाचित्रांसह हा वचननामा प्रसिद्ध झाला होता. तेव्हासुद्धा अर्थमंत्री असूनही मूग गिळून गप्प राहिलेल्या अजितदादांना निवडणुकीनंतर 'अंथरूण पाहून पाय पसरायचे असतात,' असा साक्षात्कार झाल्याचे दिसते. आता कर्जमाफीच्या विषयावरून निरनिराळ्या कोलांटउड्या मारणाऱ्या महायुतीच्या नेत्यांमध्ये सर्वात लक्षवेधी ठरले कृषिमंत्री माणिकराव कोकाटे. शेतकऱ्यांशी संबंधित खात्याचे मंत्री असूनही 'शेतकरी कर्जमाफी हा विषय आपला नाहीच,' असे सांगून त्यांनी मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांकडे बोट दाखविले. इतकेच नव्हे, तर 'हा विषय आपण ऐकलाच नाही,' अशीही पुस्ती त्यांनी जोडली आहे. माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनाही असेच व्यासपीठावर शेजारी बसलेल्यांची वादग्रस्त वक्तव्ये ऐकू येत नसत, याची या निमित्ताने आठवण होते. राजकारणात हल्ली बोलताना तोंडावर ताबा नसला तरी खपून जाते; कानांवर मात्र कृषिमंत्र्यांसारखे नियंत्रण हवे !

राज्यात बळीराजाची अवस्था बिकट आहे, यात शंकाच नाही. एकीकडे खते-बियाणे, कीटकनाशके आणि कृषिसाहित्याचे दिवसेंदिवस वाढणारे दर, मजुरीच्या दरातील वाढ; तर दुसरीकडे वेगाने कोसळणारे पिकांचे भाव हे चित्र शेतकऱ्यांच्या पाचवीला पुजले आहे. वेळोवेळी येणाऱ्या नैसर्गिक आपत्ती अडचणींत भरच घालतात. नापिकी आणि कर्जबाजारीला कंटाळून राज्यात दररोज शेतकरी मरणाला जवळ करत आहेत. अशा वेळी त्याला दिलासा देण्यासाठी तातडीचे आणि दीर्घकालीन, अशा दोन्ही उपायांची गरज आहे. दीर्घकालीन उपायांमध्ये सिंचनाच्या व्यवस्था बळकट करणे, शेतीची उत्पादकता वाढवणे, खते-बियाण्यांसह नवे तंत्रज्ञान सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणणे, यांसह सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शेतीमालाला पुरेसा दर देणे अतिशय महत्त्वाचे आहे. तातडीच्या उपायांमध्ये कर्जमाफीचा पर्याय पूर्वीपासून काही अभ्यासकांकडून मांडला जातो. यापूर्वी सन १९९० मध्ये व्ही. पी. सिंह सरकारने दिलेली माफी, त्यानंतर सन २००८ मध्ये संयुक्त पुरोगामी सरकारने दिलेली ७१ हजार कोटी रुपयांची सर्वात मोठी कर्जमाफी, यांबरोबरच देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना आणि नंतर उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात अशा मोठ्या कर्जमाफी योजना झाल्या. त्यातून शेतकऱ्यांचे सर्वच प्रश्न सुटले नाहीत; मात्र तत्कालीन अडचणींतून त्यांना नक्कीच दिलासा मिळाला आणि पुढील पीककर्ज मिळविण्याचा त्याचा मार्ग मोकळा झाला, हे सर्वच जण मान्य करतात.

# उच्च स्वप्नपूर्ती करिता जिद्द व चिकाटीच्या प्रयत्नाच्या सातत्याची आवश्यकता - प्रा. डॉ.नामदेव शिनगारे

## महामानव अभिवादन ग्रुप तर्फे शालेय साहित्य वाटप

**बीड ।प्रतिनिधी**

**शिक्षण म्हणजे सत्य जाणणे, वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगून, दैववाद, किंवा अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी परंपरेतून, बाहेर पडल्याशिवाय उच्च स्वप्नपूर्ती करिता. जिद्द, चिकाटी व प्रयत्नाच्या सातत्याची आवश्यकता आहे. अशी प्रत्येक विद्यार्थ्याने मनाशी खुणगाट बांधावी असे प्रतिपादन प्रा. डॉ.नामदेव शिनगारे यांनी केले.**

महामानव अभिवादन ग्रुपला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिन म्हणजेच २०२४ रोजी मिळालेले साहित्य वाटपाचा नव्या फेरीतील धानोरा रोड बीड नागसेन बुद्ध विहारात आयोजित कार्यक्रमात अध्यक्षपदी लाभलेल्या नागसेन बुद्ध विहार मंडळाच्या सचिव केशर कांबळे व प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ.नामदेव शिनगारे , अँड तेजस वडमारे व एस.एस. सोनवणे यांच्या हस्ते ४३ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही पेन) वाटप करण्यात आले. याप्रसंगी ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले , वाचाल तर वाचाल चे अध्यक्ष डी.जी. वानखेडे, कॅप्टन राजाभाऊ आठवले याची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक गायकवाड यांनी तर सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक



यु.एस. वाघमारे यांनी प्रस्तावित केले. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते आदर्शाच्या प्रतिमेचे पुष्प व पुष्प माला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी न्यू स्टार रायझिंग इंग्लिश स्कूलचे कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी अत्यंत सोप्या भाषेत बालकांना समजावून सांगितले की विद्यार्थीदशेत गुरुजनांची , पालकाची आज्ञा पाळणे व ज्ञान मिळवणे, तरुणपणी शील पालन करून दोन कमावले व म्हातारपणी सुख समाधानाने जगून होईल तेवढे समाज रोड फेडणे याबद्दल अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. दुसरे प्रमुख पाहुणे अँड. तेजस वाडमारे, यांनी स्पष्ट केले की विहारेही संस्कार केंद्रे व्हावीत व त्यामध्ये बालकांच्या मनावर सुसंस्कार होण्याकरता आपल्या पाल्यास दर रविवारी नियमितपणे विहारात आणून समाज प्रबोधनात्मक, तथागतांच्या , डॉ. बाबासाहेब आंबेडकर व फुले, शाहू, आंबेडकर विचारसरणीच्या सर्वच महापुरुषांच्या आदर्श विद्यार्थ्यांसमोर ठेवावा याविषयी माता भगिनींना आग्रहाची विनंती केली. तर प्रशांत वासनिक यांनी ह्या इंटरनेटच्या जमान्यात त्याचा आपल्या प्रगती करिता सदुपयोग करावा याबद्दल सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी विद्यार्थ्यांना मुलांचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डी.एम.राऊत यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करता नागसेन बुद्ध विहार महिला मंडळाच्या सर्व सदस्या व नंदिनी साबळे यांनी बहुमोल परिश्रम घेतले . कार्यक्रमास परिसरातील सोनी थोरात, विद्या कोरडे, छाया धनवे, अश्विनी साबळे, सागरबाई वीर, मनोहर कांबळे, के.एस.वाघमारे, इंजि उमाजी आठवले, संजय शिरसाठ, सुंदर तांगडे, निवृत्ती शिंदे, बहुसंख्य पालक व विद्यार्थी उपस्थिती होती सरणातयेने कार्यक्रमाची सांगता झाली.

# एस बी सी आरक्षण बचाव संघ समितीचे विविध मागण्यासाठी आमरण उपोषण चालू!

(अशोक पडोळे)

धर्माबाद-एस. बी. सी. आरक्षण बचाव संघर्ष समिती धर्माबाद तथा सकल पद्मशाली समाज महाराष्ट्र यांच्या विविध मागण्यासाठी आज एक एप्रिल रोजी धर्माबाद तहसील समोर शिवशंकर सुरकुटवार व बालाजी गंगाधर चिंतावार हे अधिकृतरित्या उपोषणास बसले असून यावेळी सकल पद्मशाली समाजाचा मोठा जनसमुदाय उपस्थित होता.




एसबीसी प्रवर्गाच्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या मागण्या लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रशासनाकडून विशेष समिती गठित करावी, वैद्यकीय, अभियांत्रिकी व इतर उच्च शिक्षणात विशेष मागास प्रवर्गासाठी दोन टक्के आरक्षण चालू वर्षापासून लागू करावे, स्वतंत्र आर्थिक महामंडळ स्थापन करावे,१०आश्रम शाळा सुरू कराव्यात, दोन टक्के राजकीय आरक्षण लागू करावे, जात पडताळणी प्रमाणपत्र तात्काळ द्यावे, विशेष मागासवर्ग विद्यार्थ्यांना राज्य शासनाच्या योजना साठी एसबीसी व केंद्र सरकारच्या योजनेसाठी ओबीसी प्रमाणपत्र प्रस्ताव दाखल झाल्याबरोबर तात्काळ द्यावे, स्वतंत्र वसतीगृहे सुरू करावे, कर्मचाऱ्यांना शासकीय व निमशासकीय सेवेत पदोन्नती द्यावी या व इतर अनेक मागण्यासाठी आज सकाळी तहसील कार्यालयाच्या प्रांगणात आमरण उपोषण चालू झाले.

यावेळी अखिल भारतीय युनायटेड पद्मशाली संघ महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष रोहित शास्त्री अडकटलावार, मराठवाडा अध्यक्ष जगन्नाथ बिंगेवार, माजी उपप्राचार्य व महाराष्ट्र राज्याचे पद्मशाली कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष शंकरराव कुंटूरकर, उमरीचे प्रसिद्ध उद्योजक श्रीनिवास अनंतवार, महाराष्ट्र राज्य पद्मपुष्प संघटनेचे सचिव तथा सेवानिवृत्त शिक्षक दिलीप मादास, नांदेड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक राजू शेठ यन्नम, धर्माबादचे तालुका अध्यक्ष नागभूषण सुरकुटवार, आरक्षण बचाव समितीचे उपाध्यक्ष तथा युवकचे तालुका अध्यक्ष अशोक येम्मेवार,शामराव बिंगेवार, गंगाधर मारावार, डॉ.विजयकुमार अन्कमवार, एडवोकेट किशनराव तानुरकर, साईनाथ गड्डी सुरकुटवार, शंकर गंगुलवार, नरेश शिलारवार, साईनाथ अवधूतवार, सिद्राम बंडेवाड, बालाजी सुरकुटवार गंगाधर गोकावार यांच्यासह पद्मशाली समाजाचे शेकडो मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवराच्या मनोगतातून पद्मशाली समाजाची एकजूट कशी भक्कम करावी व आपल्या मागण्या कशा मान्य करून घ्याव्यात यासाठी सांगोपांग भाषणे झाली. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पद्मशाली युवक संघटनेचे अध्यक्ष तथा आरक्षण बचाव समितीचे उपाध्यक्ष अशोक यममेवार यांनी विशेष परिश्रम घेतले.



## श्री. संस्थान कोरडे गणपती मंदिरातील गाभारा व सभामंडप हिरव्या द्राक्षांनी व विविध फुलांनी आकर्षक सजवला

बीड ।प्रतिनिधी

कर्जत येथील शेतकऱ्यांनी पिकवलेल्या रसायनविरहित ५०० किलो द्राक्षांची आरास केली. ही द्राक्षे नंतर भाविक, अनाथाश्रम, जिल्हा रुग्णालय व तसेच इतर रुग्णालये येथे प्रसाद म्हणून दिली जाणार आहेत. द्राक्ष महोत्सवाच्या सजावटीसाठी जवळपास १४ ते १५ तास अवधी लागला यात श्री संस्थान कोरडे गणपती येथील अनुज काळे अथर्व काळे मयुरेश बाहेगव्हाणकर कौस्तुभ देशमुख ऋषिकेश कव्हाळे अथर्व हरी गौरव देशपांडे सार्थक देशमुख मानस गुळवेलकर सारंग कुलकर्णी मानस मोकाशी तनिष्क खडकीकर नारायण काळे शंतनू कुसुंबे अथर्व जोशी संकेत जोशी गुरुनाथ जोशी महेश जोशी वरद शेणकुडे कुणाल जोशी रमाकांत बेहेरे शरद सावंत अभिनयन गायकवाड ओमकार वाघमारे साईनाथ जोशी अथर्व पवार अथर्व मंखले मानव कुलकर्णी प्रथमेश वाघिरकर कुणाल कुलकर्णी या सदस्यांनी मेहनत घेतली यांना जगदीश भाऊ काळे अनिल काळे अशोक काळे बंडू जोशी आशिष काळे यांनी मार्गदर्शन केले.

# लिंबागणेश येथे अर्धमसला मस्जिद स्फोट आणि पाचेगाव येथील कानिफनाथ मंदिरावर हिरवे झेंडे

## फडकवत सामाजिक सलोखा बिघडवणा-या समाजकंटकांवर कठोर कारवाईसाठी निदर्शने :- डॉ.गणेश ढवळे



लिंबागणेश ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील अर्धमसला गावातील मशिदीमध्ये रमजान ईदच्या पुर्वसंध्येला आणि गुढीपाडव्याच्या दिवशी समाजकंटकांनी मस्जिदच्या आतील भागात जिलेटीनच्या कांड्यांनी स्फोट घडवून आणला. स्फोट घडवून आणलेल्या ठिकाणी मोठा खड्डा पडला असून भिंतीला तडे गेले आहेत, खिडक्या, दरवाजे,पंखे तुटून पडले आहेत.या घटनेने जिल्हा हादरला असुन संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे .या घटनेचा सर्व स्तरातून निषेध होऊ लागला असुन स्फोट घडवुन दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने पुर्व नियोजित कट करून मुस्लिम समाजाच्या प्रार्थना स्थळाचे नुकसान करत धार्मिक भावना दुखावणा-या समाजकंटकांना कठोरात कठोर शासन करण्यात यावे या मागणीसाठी आज दि.१ एप्रिल मंगळवार रोजी सकाळी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील सर्व समाजबांधवांनी एकत्र येऊन गावाच्या मुख्य प्रवेशद्वारावर स्फोट घडवणा-या समाजकंटकांवर कठोर कारवाई करा, हम सब एक है, हिंदू -मुस्लिम भाई भाई अशी घोषणाबाजी करत काळे झेंडे दाखवत तिव्र निदर्शने करण्यात आली. याचवेळी गेवराई तालुक्यातील पाचेगाव येथील कानिफनाथ मंदिरावर काही लोकांनी हिरवे झेंडे लावून तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागण्याचे निवेदन पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, गृहमंत्री यांना देण्यात आले. यावेळी डॉ.गणेश ढवळे , भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ,सरपंच बालासाहेब जाधव,राजेभाऊ गिरे, बाळकृष्ण थोरात,शेख समीर, लेनाजी गायकवाड,शेख ख्वाजा, संतोष भोसले, गणपत तागड,विक्रांत वाणी, अँड.गणेश वाणी ,बाळासाहेब मुळे

## पान १ वरून...

**पालकमंत्री अजित...**

प्रकल्पीय सिंचन क्षेत्र पुनर्स्थापित करण्याच्या दृष्टीने व सुलभ पूरनियंत्रणा करिता उभ्या उचल पद्धतीची द्वारे बसविण्याच्या दृष्टीने ब्रम्हनाथ येळंब कोल्हापूर पद्धतीच्या बंधा-याचे बॅरेजमध्ये रुपांतरण करण्याच्या कामाच्या एकूण १७.३० कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास विस्तार व सुधारणा अंतर्गत काही अटी व शर्तीसह प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली.

बीड जिल्ह्यातील सिंदफणा नदीवर सुमारे ३० ते ३५ वर्षापूर्वी बांधलेला टाकळगांव हिंगणी कोल्हापूर पद्धतीचा बंधारा नादुरुस्त झाला आहे. यामुळे सदर बंधा-याचे रुपांतरण बॅरेजमध्ये करण्यास शासनाने ऑक्टोबर, २०२१ मध्ये तत्वत: मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने पुरेसा पाणीसाठा व मोठ्या क्षेत्रास सिंचन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने तसेच पूरनियंत्रणा करिता या टाकळगांव हिंगणी कोल्हापूर पद्धतीच्या बंधा-याचे बॅरेजमध्ये रुपांतरण करण्यात येणार आहे. या कामाच्या १९ कोटी ६६ लाख रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली.

बीड जिल्ह्यातील सिंदफणा नदीवरील निमगांव कोल्हापूर पद्धतीचा बंधारा नादुरुस्त आहे. या बंधा-याचे बॅरेजमध्ये करण्यास रुपांतरणास २०२२ मध्ये मध्ये तत्वत: मान्यता दिलेली आहे. त्यामुळे या बॅरेजच्या रुपांतरणास व त्यासाठीच्या २२ कोटी ८ लाख रुपायांच्या कामांना आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

**सोसाटयाच्या वारयाने....**

आजूबाजूला अस्तव्यस्त पसरल्या त्यामध्ये टोकवाडी येथील गट नंबर ८७ मधील शेतकरी संदीप गंगाधर नवटके यांच्या विहिरीवरील सोलर पंप बसवलेला होता त्या सोलर पंप च्या सोलर प्लेटवर झाडांच्या फांद्या येऊन आदळल्या आणि त्यामध्ये त्यांच्या सोलर पंप च्या दोन ते तीन प्लेट तडकल्या आणि वाकल्या तसेच या तुफानी वाऱ्यामुळे या शेतकऱ्याचे खूप नुकसान झाले तर काही पिकांचेही नुकसान झाले आहे बऱ्याचश्या झाडांच्या फांद्या मोडून पडल्या काही फांद्या गुरा ढोरावर देखील पडल्या पण सुदैवाने ते सर्व सुखरूप राहिले निसर्गाच्या या आकस्मिक आपत्तीमुळे प्राणहानी टळली.

**शिरूर, गेवराई तालुक्याला..**

## पान १ वरून...

राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या उपस्थितीत पार पडली. ना. पंकजाताई मुंडे यांच्यामुळे या बैठकीत बीड जिल्ह्याला विकासाचं गिफ्ट मिळालं. जिल्ह्यातील सिंदफणा नदीवरील निमगाव (ता. शिरूर, जि. बीड) कोल्हापुरी पद्धती बंधारा याचा विस्तार आणि सुधारणेअंतर्गत बॅरेजमध्ये रूपांतरण करण्यासाठी २२.०८ कोटी रुपये, सिंदफणा नदीवरील ब्रम्हनाथ येळंब (ता. शिरूर, जि. बीड) कोल्हापुरी पद्धती बंधारा याचा विस्तार आणि सुधारणेअंतर्गत बॅरेजमध्ये रूपांतरण करण्यासाठी १७.३० कोटी रुपये आणि सिंदफणा नदीवरील टाकळगाव (हिंगणी) (ता. गेवराई, जि. बीड) कोल्हापुरी पद्धती बंधारा याचा विस्तार आणि सुधारणेअंतर्गत बॅरेजमध्ये रूपांतरण करण्यासाठी १९.६६ कोटी रुपये अशा तीन कामांना बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

जिल्ह्यात पाऊल ठेवण्यापूर्वीच निधी आणला

ना. पंकजाताई मुंडे उद्या २ एप्रिल रोजी बीड जिल्हयात येत आहेत. आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यांनी जिल्हयात पाऊल ठेवण्यापूर्वीच हा निधी मंजूर करून घेतल्याने शेतकऱ्यांसह जिल्हावासियांनी आनंद व्यक्त केला आहे.

**बीडमध्ये शिवसेनेची उद्या ...**

सदस्य नोंदणीचा शुभारंभ होणार असून शिवसैनिकांनी मोठ्या प्रमाणात बैठकीस उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी दिली.

शिवसेना ही काळातील जन माणसांचे काम करणारी संघटना म्हणून ओळखली जाते. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नेहमीच पक्ष वाढीसाठी प्रयत्नशील असतात. यामुळे बीड जिल्ह्यातही शिवसेना अधिक भक्कम होण्यासाठी शिवसेनेची सदस्य नोंदणी करण्यात येणार आहे. याचा शुभारंभ तसेच पक्ष वाढीसाठी उद्याच्या बैठकीत चर्चा होणार आहे. यावेळी जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे मार्गदर्शन करणार आहेत. मागील सदस्य नोंदणीचा आढावा घेण्यात येणार आहे. बैठकीस शिवसेना उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, शहरप्रमुख ,महिला आघाडी,

## पान १ वरून...

युवासेना,शेतकरी सेना ,ओबीसी सेना, अनुसूचित जाती जमाती सेना आजी माजी लोकप्रतिनिधी शाखाप्रमुख व शिवसैनिक यांनी उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी केले आहे.

**मराठी अभिनेते सयाजी ...**

आम्ही रोज रोज कसा जिवंत राहिले याचा विचार आम्ही करत आहोत असे सयाजी शिंदे यांनी सांगितले.पुढे बोलताना म्हणाले देशमुख कुटुंबाला लवकरात लवकर न्याय द्यावा.मला देशमुख कुटुंबाची काळजी होती म्हणून भेट घेतली.. गोष्टी परत परत काढल्या तर त्याचा त्रास होतो असे प्रसार माध्यमांशी बोलत होते.याप्रसंगी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते .

**जिल्हा वाहतुक शाखेचा..**

केल्याच्या घटना घडल्याने गुन्हेगारांना चांगलाच वचक बसला आहे त्यामुळे बीड जिल्हा पोलीसांवर जनतेचा विश्वास वाढलेला दिसत आहे अशातच आज रोजी जिल्हा वाहतुक शाखेने मोटार वाहन कायद्या अंतर्गत परळी येथे संभाजीनगर पोलीस स्टेशनच्या अंतर्गत अप्पर पोलीस अधिक्षक सचिन यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष, संभाजीनगरचे पोलीस निरीक्षक धनंजय यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय यांच्यासोबत पोलीस हवालदार शांतीलाल, पोलीस हवालदार विष्णु, पोलीस नाईक आदिनाथ, पोलीस अंमलदार विश्वजित, चालक हवालदार संतोष व संभाजीनगरचे पोलीस अंमलदार दिलीप यांच्या सहकार्याने दुपारी ११ ते १ च्या दरम्यान परळी वै.उड्डाणपुल, एकमिनार चौक येथे विविध कलमांतर्गत लायसन्स नसणे, विमा नसणे, काळी काच, नो पार्किंग, ट्रिपलसीट या सदराखाली एकुण ९५ केसेस व दंड ६६ हजार रुपये करण्यात आला व रोख ६ हजार ८०० रुपये दंड वसुल केला. या दरम्यान पोलीस स्टेशन गंगाखेड गु.र.नं.४५/२४ कलम ३७९ अंतर्गत चोरीस गेलेली मोटारसायकल क्र.एम.एच.२२ बीबी ३२६१ हे वाहन आरोपी नामे शेख मोहम्मद शेख नबीसाब बागवान,रा.वैजवाडी, ता.परळी सह पकडली व पोलीस स्टेशन संभाजीनगर यांच्या स्वाधीन केले.



बीड - सावता परिषदेच्या प्रधान महासचिव पदी डॉक्टर राजीव काळे यांची निवड झाल्याबद्दल सिंदखेडराजा येथील राजमाता जिजाऊ यांचे वंशज शिवाजी राजे जाधव यांच्या हस्ते नितीन भैया धांडे यांच्या निवासस्थानी शिवसेना व धांडे परिवाराच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कु. शितल जाधची पंजाब नॅशनलाईज बँक ऑल इंडिया मध्ये मार्केटिंग ऑफिसर क्लास टू च्या पदी नियुक्ती!

धर्माबाद (अशोक पडोळे)

इन्स्टिटच्यूट ऑफ बँकिंग पर्सनल रिलेशन म्हणजेच आय बी पी एस तर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेत धर्माबाद येथील रहिवासी कुमारी शीतल सर्जेराव जाधव हीने घवघवीत यश मिळवत पंजाब नॅशनलाईज बँक ऑल इंडिया मध्ये मार्केटिंग ऑफिसर्स स्केल वन म्हणजेच क्लास टू च्या पोस्टला गवसणी घालून धर्माबादचे नाव लौकीक केले आहे.

कुमारी शीतल ही येथील सामाजिक कार्यकर्ते सर्जेराव जाधव तथा प्राथमिक शिक्षिका व जिजाऊ ब्रिगेडच्या तालुका अध्यक्षा सावित्रा ताई कदम उर्फ जाधव यांच्या सुकन्या असून त्यांच्या भावानेही बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये रायगड येथे कॅशियर ऑफिसर मधून रुजू झाले आहेत. कुमारी शितल इथे तिचे दहावीपर्यंतचे शिक्षण येथील हुतात्मा पानसरे हायस्कूल मध्ये झाले असून अकरावी बारावी व बीएससी कॅम्पुटर येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालय धर्माबाद येथे झाले आहे. कुमारी शीतल येथेच न थांबता हैदराबाद मध्ये दोन वर्षाचा एमबीए हा कोर्स पूर्ण केला असून सदरील बँकेची प्रीलियम परीक्षा तिने डिसेंबर२०२४ मध्ये दिली, मेन परीक्षा जानेवारीच्या उत्तरार्धात२५ जानेवारी रोजी देत तोंडी परीक्षेला फेब्रुवारी२०२५मध्ये ती सामोरे गेली आहे. आज एक एप्रिल रोजी सदरील परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून ती थेट मार्केटिंग ऑफिसर्स स्केल वन म्हणजेच



क्लास-२ पोस्टला पंजाब नॅशनलाईज बँक मध्ये गवसनी घातली आहे. त्यामुळे धर्माबाद शहरात तिच्यावर कौतुकाचा पाऊस पडत आहे.

## ऋषिकेश तट यांची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड



आपेगाव ।प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतलेल्या पोलीस उपनिरीक्षक पदाच्या परीक्षेत आपेगाव येथील ऋषिकेश दत्तात्रेय तट त्यांनी यश मिळवले आहेऋषिकेश तर यांचे प्राथमिक शिक्षण योगेश्वरी शिक्षण संस्था आंबेजोगाई येथे झाली आहे व अकरावी बारावी दयानंद कॉलेज लातूर येथे झाली असून अभियांत्रिक शिक्षणासाठी पुणे येथील सिंहगड कॉलेज बीई मेकानिकल शिक्षण पूर्ण केले त्यानंतर ज्ञानदीप अकादमी जॉईन केली सन २०२० ला कोरोनाच्या महामारीमुळे आंबेजोगाई येथे परत येऊन गणेश नगरला साखरे सर चाटे सर यांच्या अभ्यासिका सुरू केली ऑनलाइन क्लासेस करून हे यश प्राप्त केले आहे महाराष्ट्र लोकसेवा आयोग सन २०२४ मध्ये कर निरीक्षक या पदाची परीक्षा दिली व नगरपरिषदेत सध्या कार्यरत असून २०२३ यावर्षी महाराष्ट्र लोकसेवा आयोग पीएसआय ची परीक्षा दिली व २५ मार्च २०२५ निवड झाली आपेगाव मधील पहिला युवक पीएसआय पदी निवड झाल्यामुळे सर्वत्र गावांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे त्याच्या निवडीमुळे गावकऱ्यांच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे वडील शिक्षक असल्याने त्यांच्या मार्गदर्शनाने आई गृहिणी असून त्यांच्या आशीर्वादाने मी आज या पदावर पोहोचलो आहे आई-वडिलांच्या ऋणात मी नेहमी असं गावकऱ्यांच्या सहकार्याबद्दल मी सर्वांचे आभार मानत आहे असे मनोगत व्यक्त केल



# बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण पोक्सो जागृती शिबिर संपन्न

बीड ।प्रतिनिधी

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जिल्हा सत्र न्यायालय बीड व राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दि ०१/०४/२०२५ रोजी राष्ट्रीय प्राथमिक विद्यालय बीड या ठिकाणी बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कायदा २०१२ बाबत जनजागृती कार्यक्रम न्या आनंद यावलकर अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड न्या जी जी सोनी सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड मार्गदर्शनाखाली संपन्न झाले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका के. व्ही सोनी तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून अधिकार मित्र तथा विधिदूत तत्वशील कांबळे,अधिकार मित्र मिथुन जोगदंड आदी उपस्थित होते. यावेळी अधिकार मित्र कांबळे यांनी विस्तृत मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुरवसे पी.डी यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जाधव डी.सी, सय्यद ए एस., राऊत एस व्ही,जोशी एन. बी, मस्के पी एल, जाधव एस डी सहकार्य केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन घाडगे एस टी यांनी केले

# महायुती सरकारने कर्जमाफी नाकारून बळीराजाशी दगाफटका केला

## शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम

बीड ।प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवा मुळे महायुतीने विधानसभा निवडणुकी पूर्वी फसव्या आणि खोट्या घोषणांचा पूर आणला होता त्या पैकीच ऐक असणारी घोषणा म्हणजे शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन शेतमालाला योग्य हमी भाव देऊन त्यांना सुखाचे दिवस आणू असे आश्वासन देऊन सर्वसामान्य शेतकऱ्यांची मते पदरात पाडून घेतली पण सरकार आल्यावर सदरील घोषणेला महायुती सरकारने हरताळ फासला आहे शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे तर दूरच उलट त्यांना ३१ मार्च पर्यंत कर्ज भरण्यासाठी दम दिला जात आहे.राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी जाहीरपणे शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार नाही असे सांगितले त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही त्यांचीच भाषा बोलून कर्जमाफी कदापि ही होणार नाही असे सांगितले

ज्या सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मतावर व जीवावर हे सरकार अस्तित्वात आले त्यांच्या सोबतच ह्या महायुती सरकारने दगा फटका करून त्यांना अजूनही आर्थिक अडचणीत आणण्याचे व शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे काम केले आहे.याउलट देशातील व राज्यातील उद्योगपतींना केंद्र व राज्य सरकार कडून न मागता हजारो कोटींची कर्जमाफी देण्यात आली असून हे सरकार सर्व सामान्य शेतकरी, जनतेचे नसून उद्योगपतींचे आहे अशा संकटाच्या काळात शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्ष



शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर पणे उभे राहणार असून त्यांना कर्जमुक्ती मिळवून देण्यासाठी मोठे जनआंदोलन उभे करणार आहे असे प्रसिदीस दिलेल्या पत्रकात शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास प्रकाशराव गिराम यांनी म्हटले आहे.

# दिंद्रुडच्या अखंड शिवनाम सप्ताहास ३१ वर्षाची परंपरा

दिंद्रुड ।प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी दिंद्रुड येथे मराठी नववर्षाच्या शुभमुहूर्तावर अखंड शिवनाम सप्ताह, ग्रंथराज परमरहस्य पारायण व शिवकिर्तन महोत्सवास उत्साहात सुरुवात झाली. तब्बल ३१ वर्षाची परंपरा असलेल्या या शिवनाम सप्ताहात राज्यभरातील नामांकित कीर्तनकार धार्मिक प्रबोधन करणार आहेत. या सोहळ्यात भाविक भक्तांनी उपस्थित राहण्याचे आवाहन वीरशैव समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील श्री मन्मथस्वामी मठात मागील ३१ वर्षांपासून नववर्षाच्या चैत्र शुद्ध १ ते चैत्र शुद्ध ८ या आठ दिवसांत अखंड शिवनाम सप्ताह, श्री मन्मथ स्वामी लिखीत ग्रंथराज परम रहस्य पारायण व शिव कीर्तन महोत्सव आयोजित करण्यात येतो. रविवारी ज्ञानेश्वर महाराज शेटे, सोमवारी अमोल महाराज लांडगे, मंगळवारी सतीश महाराज सायखेडाकर यांचे शिवकीर्तन संपन्न झाले. वीरशैव धर्माचा इतिहास व वीरशैव दैवतांनी धर्माचे आचरण कसे करावे याबाबत कीर्तनकार मंडळीने प्रबोधन केले. बुधवारी लक्ष्मण महाराज विभुते, गुरुवारी भाग्यश्री विरकर, शुक्रवारी निळकंठ महाराज विभुते, शनिवारी दुपारी टाळ आरती चे किर्तन उमाकांत आप्पा शिराळे, रात्रौ डॉ. अनंत महाराज बिडवे, रविवारी महाप्रसादाचे कीर्तन वीरूपाक्ष आप्पा वैरागकर आदी शिवभक्ती परायण महाराजांची कीर्तन सेवा होणार आहे. सौ. शिल्पा ओमप्रकाश शेटे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रशांत रमेशराव कुलकर्णी, दिलीप मन्मथआप्पा गौंडर, दत्तात्रय ठोंबरे, अजय दिलीपराव कोमटवार, छाया भागवतराव दराडे, महेश वसंतराव ठोंबरे, प्रदीप विठ्ठलराव ठोंबरे, अतुल जालिंदर चव्हाण यांनी कीर्तन महोत्सवाचे यजमानपद स्वीकारले आहे. सप्ताह काळात दररोज सकाळी नाश्ता व दुपारी प्रसादाची व्यवस्था वीरशैव समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. दिंद्रुड व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन समस्त वीरशैव समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

# प्रहारच्या महिला जिल्हा कार्याध्यक्षपदी अर्चना नाथ तर संपर्कप्रमुख पदी मनिषा पांढरे यांची निवड

बीड ।प्रतिनिधी

प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीडच्या महिला जिल्हा कार्याध्यक्षा म्हणून श्रीमती अर्चना बाबासाहेब नाथ, सहशिक्षिका जि. प. के. प्रा. शा. पारगाव जो.ता. आष्टी जि.बीड यांची तर जिल्हा संपर्कप्रमुख पदी श्रीमती पांढरे मनिषा रंगनाथ, सहशिक्षिका,जि प. प्रा शा मुस्लिम वस्ती केंद्र कन्या शिरूर कासार यांची निवड जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी केली असल्याची माहिती जिल्हा कार्याध्यक्ष ओमप्रकाश आनेराव यांनी दिली आहे.

विशेषतः शिक्षिका भगिनींना शिक्षण विभाग, बदली, वेतन, वैद्यकीय परिपुर्ती देयके,भनिनि इत्यादी माहिती थेट मिळावी, यासाठी प्रहार दररोज विविध माहिती, अपडेट देत असते, असे यावेळी जिल्हा प्रवक्त्या निर्मला वाघमारे व कार्याध्यक्षा सय्यद मुमताज यांनी सांगितले आहे. जिल्हाभरातील शिक्षिकांना सर्वार्थाने सक्षम करण्यासाठी प्रहार आज गुढीपाडवा हा मुहूर्त साधत महिला पदाधिकारी यांची जिल्हाभरात निवड करण्यास सुरुवात करत आहे. याच अभियानाची एक चांगली सुरुवात म्हणून आज उच्चशिक्षित,आदर्श, विद्यार्थी प्रिय, उपक्रमशील व तंत्रस्नेही शिक्षिका श्रीमती अर्चना नाथ यांची जिल्हा महिला कार्याध्यक्षा म्हणून तर श्रीमती मनिषा पांढरे यांची जिल्हा संपर्कप्रमुख पदी निवड करण्यात आली आहे.

बीड जिल्ह्यामध्ये मागील दहा वर्षांपासून अत्यंत उत्कृष्ट असे शैक्षणिक व सामाजिक कार्य करणाऱ्या या दोन्ही पदाधिकारी यांच्या निवडीमुळे महिला शिक्षकांचे प्रश्न निकाली काढण्यासाठी मोठी मदत होणार आहे,असे जिल्हा संघटिका श्रीमती संध्या टेकाळे,प्रविणा कांबळे, गुड्डी घाडगे मॅडम यांनी मत व्यक्त केले आहे. दोन्ही पदाधिकारी यांचे प्रहार परिवारात मनःपूर्वक स्वागत करण्यात येत असून, या निवडीबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करुन त्यांना पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा प्रहार पदाधिकारी जिल्हा सचिव- अविनाश काळे, कोषाध्यक्ष- उत्तरेश्वर बजगुडे, उर्दू विभाग प्रमुख- मिर्झा हसनात, जिल्हा कार्याध्यक्ष -ओमप्रकाश आणेराव, प्रहार पेन्शनर सेल प्रमुख- सुरेश प्रधान व राजेसाहेब चव्हाण, आरोग्य विभाग प्रमुख गोविंद गोचडे, प्रहार एज्युकेशन सेल प्रमुख अरविंद चौधरी व अण्णासाहेब खंडागळे, प्रहार जुनी पेन्शन सेल प्रमुख -सुदर्शन काळे ,प्रविणा कांबळे , प्रहार तक्रार निवारण सेलचे प्रमुख- पी. आर. खेडकर व पुरषोत्तम खेत्रे ,कार्याध्यक्ष - नवनाथ धोंगडे , सय्यद मुमताज , वैशालीताई आकुसकर, सहसचिव अंबादास बागलाने, जिल्हा प्रवक्ता- पद्माकर आंधळे , मन्मथ अरबने, किरण सारुक , निर्मलाताई वाघमारे जिल्हा उपाध्यक्ष-कादरी कदीर (शिक्षकेतर विभाग), पी. आर. खेडकर,महादेव गीते, शामराव मिरगे ,दिपक देशमुख,प्रल्हाद फड, शेख ऐनोद्दीन , वर्षाराणी महाजन समन्वयक - संजय पाटील, शामराव आघाव, अण्णासाहेब खंडागळे, शिवाजी झेंडेकर संघटक- श्रीमती प्रविणाताई कांबळे, बापूसाहेब शिंदे , अशोक सप्रे, सुरेश वाघमारे, संजय लोखंडे संपर्कप्रमुख- संध्याताई टेकाळे, वसंत तरकसबंद, राजाराम लकडे, राजेंद्र बेले, पांडुरंग जोगदंड , शहादेव मराठे , विठ्ठल सानप,सहसचिव - अंबादास बागलाने , महेश भट, संजय कुलकर्णी, बीड तालुकाध्यक्ष - सय्यद जिलानी, वडवणी





तालुकाध्यक्ष -संगीता तिडके, शिरूर कासार तालुकाध्यक्ष- दत्तात्रय गाडेकर , गेवराई तालुकाध्यक्ष - बाळासाहेब गावडे, माजलगाव तालुकाध्यक्ष लक्ष्मण सरवदे, पाटोदा तालुकाध्यक्ष -मुकींद गाडे, आष्टी तालुकाध्यक्ष भाऊसाहेब काळे, धारूर तालुकाध्यक्ष- हनुमंत मंत्रे, परळी तालुकाध्यक्ष - कमलाकर कामाळे, अंबेजोगाई तालुकाध्यक्ष- बाळासाहेब पिसुरे, केज तालुकाध्यक्ष - प्रभूकांत सोन्ने, उर्दू विभाचे सय्यद अस्लम हबीब सर, बीड तालुका कार्याध्यक्ष (उर्दू विभाग) सय्यद अर्शद अली मेहबूब, प्रा. पदवीधर वडवणी तालुका कार्याध्यक्ष पदी (उर्दू विभाग) ,शेख इलियास सर शिरुर तालुका उपाध्यक्ष , फारुकी रईसोद्दीन अनिसोद्दिन शिरूर तालुका कार्याध्यक्ष शेख फैजल रेहमान अब्दुल सईद प्रा पदवीधर यांची गेवराई तालुका कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

## रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनी लि. यांना ग्राहक आयोग बीड यांचे नुकसान भरपाई देण्याचे आदेश

बीड ।प्रतिनिधी

मशिनचे पार्ट चोरीस गेल्याबाबत विमा नुकसान भरपाई देण्यास नकार दिल्यामुळे रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनी लि. यांना ग्राहक आयोग बीड यांचे ५ लाख ६४ हजार रुपये रक्कम नुकसान भरपाई तसेच तक्रारीचा खर्च मानसिक व शारिरीक त्रासापोटी ५० हजार रुपये देण्याचे आदेश दिल्याने सदरील विमा कंपनीला आयोगाचा चांगलाच दणका बसला आहे.

याबाबत माहिती अशी की, अंबिका रिचार्ज अॅन्ड सोल्युशन्स चे मालक यांनी आपल्या होरीझॉन्टल डायरेक्शन ड्रिलिंग मशीनसाठी विमा घेतलेला होता व सदरील मशीनवर अॅक्सीस बँकेचे कर्ज घेतलेले होते सदरील मशीनमधील दि.१५ नोव्हेंबर २०२३ रोजी काही पार्ट्स व बॅटर्या चोरीला गेल्या त्याची एकूण किंमत ५ लाख ६४ हजार रुपये इतकी होती त्यावर तक्रारदार यांनी विमा कंपनीला विमा नुकसान भरपाई मागितली असता त्यांनी मशीनचे पार्ट्स विम्यामध्ये कव्हर होत नाहीत असे सांगून विमा फेटाळला. त्यामुळे तक्रारदार यांनी जिल्हा व सत्र न्यायालयातील अॅड.बी.डी.सारडा यांच्या मार्फत ग्राहक आयोग बीड येथे ग्राहक तक्रार क्रमांक २७४/२०२४ अन्वये तक्रार दाखल करुन विमा कंपनीस नोटीस दिली. सदरील नोटीस मिळाल्यानंतर विमा कंपनी हजर राहिली नाही परंतू बँकेने हजर होवून आपले म्हणणे मांडले तसेच विमा कंपनीविरुध्द एकतर्फी आदेश पारित करण्यात आला.

सदरील प्रकरणाची सुनावणी होवून अॅड.बी.डी.सारडा यांनी तक्रारदाराची बाजू भक्कमपणे मांडल्यामुळे आयोगाने सदरील तक्रार मान्य करुन विमा कंपनीला ५ लाख ६४ हजार रुपये नुकसान भरपाई तसेच तक्रारीचा खर्च व मानसिक व शारिरीक त्रासापोटी ५० हजार रुपये मुदतीत देण्याचे सांगितले तसेच तक्रार दाखल दिनांकापासून त्यावर द.सा.द.शे.८% दराने व्याज देण्याचे आदेशित केले आहे.

# नववर्षाच्या स्वागताला संस्कार भारतीने उलगडला पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा जीवनपट

**बीड ।प्रतिनिधी**

**अठ्ठावीस वर्षाची परंपरा लाभलेल्या कनकालेश्वर महोत्सवात यंदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्रावरील कुलदीप धुमाळे लिखित कर्तृत्वशालिनी राजयोगिनी पुण्यश्लोक अहिल्या ही नाटिका सादर करण्यात आली. तर विख्यात पखवाजवादक कृष्णा सोळंके यांनी पखावजवर शिवतांडव हे विविध तालांचे अनोखे वादन सादर केले. लोककलावंत बबनमहाराज घुगे यांनी गवळणी सादर केल्या.तर साई नृत्यालयाच्या विद्यार्थिनींनी तरंगत्या रंगमंचावर भरत नाट्यम सादर केले.**

प्रारंभी कनकालेश्वर महोत्सवाचे उद्घाटन युवा नेते योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते आणि पश्चिम क्षेत्र प्रमुख चंद्रकांत घरोटे, भरत लोळगे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि स्नेहल पाठक यांच्या अध्यक्षेतेखाली दीप प्रज्वलित करून करण्यात आले ,यावेळी संस्कार भारतीचे माजी महामंत्री कुलदीप धुमाळे यांचा अमृत महोत्सवी सत्कार करण्यात आला.व्यासपीठावर प्रमोद वझे,महेश वाघमारे, डॉ.विद्यासागर पाटांगणकर,सतीश महामुनी ,शेषनाथ वाघ उपस्थित होते. प्रास्ताविक प्रांत मंत्री प्रमोद वझे यांनी केले. यावेळी संस्कार भारती, बीडच्या दिनदर्शिकेचे आणि दैनंदिनीचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.यावेळी योगेश क्षीरसागर यांनी आगामी काळात हा मोहोत्सव अधिक भव्यदिव्य पध्दतीने साजरा



करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे वचन दिले तर कुलदीप धुमाळे यांनी सत्काराला उत्तर देतांना आपण संस्कार भारतीमुळे घडलो अशी कृतज्ञता व्यक्त केली.

संस्कार भारती बीड शाखेच्या वतीने गेल्या २८ वर्षांपासून कनकालेश्वर महोत्सव साजरा केला जातो चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात पाडव्याच्या दिवशी मराठी नववर्षाचे स्वागत आगळ्यावेगळ्या पद्धतीने कंकालेश्वर मंदिराच्या जलाशयासमोर उपस्थित नागरिकांनी कनकालेश्वरावर पुष्पवृष्टी करून नववर्षाचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरवात नृत्यगुरू अनुराधा चिंचोलकर यांच्या साई नृत्यालयाच्या विद्यार्थिनींच्या तरंगत्या रंगमंचावरील भरत नाट्यमने झाली.राज योगिनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे यंदाचे त्रिशताब्दी जन्मवर्षाच्या निमित्ताने त्यांच्या जीवनपटावर आधारित एक नाटिका संस्कार भारती बीडच्या वतीने सादर करण्यात आली. या नाटिकेत स्नेहा परगावकर, कौमुदी रुईकर यांनी अहिल्यादेवीच्या भूमिका साकारल्या.या सादरीकरणास रसिकांनी मोठा प्रतिसाद दिला. तसेच कृष्णा साळुंखे यांनी कमी वेळेत अधिक परिणामकारक पखवाज वादन सादर करून उपस्थितांना तालावर डोलायला लावले.एकाच गवळणीत सात विविध रंगाच्या साड्या लीलया बदलत बबनमहाराज घुगे यांनी सादर केलेली 'सात रंगाच्या सात गवळणी ' ही गवळण रसिकांनी डोक्यावर घेत टाळ्यांचा कडकडाट करून प्रतिसाद दिला त्यांना हार्मोनियमवर भरत लोळगे आणि तबल्यावर प्रकाश मानूरकर यांनी साथ दिली. भारतमाता टाळ नृत्य समूहाने अनोखे टाळनृत्य सादर करून उपस्थित रसिकांच्या कान आणि डोळे तृप्त केले.नामदेव साळुंके यांच्या विद्यार्थ्यांनी प्रारंभी संस्कार भारती गीत सादर केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश साळुंके आणि गणेश तालखेडकर यांनी केले.

मोहोत्सव यशस्वी करण्यासाठी संस्कार भारती बीडचे अध्यक्ष लक्ष्मीकांत सौंदत्तीकर,संतोष पारंगावकर, वासुदेवराव निलंगेकर,डॉ.राहुल पांडव, गणेश स्वामी,केदारनाथ बहिरमल,अशोकदेवा कुलकर्णी, अशोका कुलकर्णी ,......... आदींनी परिश्रम घेतले.

# माहेश्वरी प्रगती मंडळाचा स्तुत्य उपक्रम :रखरखत्या उन्हाच्या चाहूलात बीड बस स्थानकात शीतल जलपेयची व्यवस्था

बीड ।प्रतिनिधी

माहेश्वरी प्रगती मंडळ बीडच्या वतीने मागील तीन दशकापासून बीड शहरात अनेक समाज उपयोगी सामाजिक, धार्मिक, वैद्यकीय, शैक्षणिक, पर्यावरणपूरक व सांस्कृतिक कार्य चालू असून मागील अनेक वर्षापासून ग्लोबल वार्निंगमुळे आपल्याकडे उन्हाची दाहकता वाढत आहे. यावर्षी मार्च महिन्यातच उष्णतेचे चटके बसण्यास सुरुवात झाली असून तापमान ४२ अंश सेल्सिअसपर्यंत गेले आहे. बीड बस स्थानकात दररोज हजारो प्रवासी उन्हाची लाही लाही सहन करीत प्रवास करीत असतात. बस स्थानकात व स्थानकापासून जवळपास ४० किलोमीटर अंतरापर्यंत मोफत व शुद्ध जल पेयाची व्यवस्था नाही तसेच मोजकेच प्रवासी बाटलीचे पाणी पिऊ शकतात त्यामुळे बसस्थानकातील अनेक प्रवाशांनी व व्यवस्थापन समितीने मोफत शितल ,शुद्ध जलपेयाची व्यवस्था करण्याचे आवाहन केले. तद्नुसार मागील वर्षी प्रमाणे यावर्षीही रविवार दि.३० मार्च २०२५ रोजी गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर अत्यंत सुसज्ज असलेली शुद्ध, थंड शीतल व मोफत पेयजल पिण्याच्या पाण्याची व्यवस्था माहेश्वरी प्रगती मंडळाद्वारे करण्यात आली. बीड बस स्थानकातील मोफत पानपोईचे उद्घाटन मा.श्री. दिलीपजी धूत (मा. संचालक ,महाराष्ट्र पर्यटन मंडळ, मुंबई), संपादक श्री. दिलीपजी खिस्ती (दैनिक लोकप्रश्न), सौ. अनुजाताई दुसाने (विभागीय नियंत्रक बीड), श्री संतोषजी डोके (आगार प्रमुख) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी माहेश्वरी प्रगती मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र कासट, सचिव जुगलकिशोर बियाणी, ज्येष्ठ सदस्य सी.ए. सुरेशजी लड्डा, संपर्कप्रमुख विष्णुदास बियाणी, सि.ए. गोपाल कासट, सुरज




लाहोटी, उपाध्यक्ष संतोष टवाणी, बाळकिसन बियाणी यांनी मंडळाच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. सर्व प्रमुख अतिथी मान्यवर व मंडळाचे सर्व सदस्यासमवेत फीत कापून व श्रीफळ वाढवून यथोचित मोफत पाणपोईचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी मंडळाच्या उपक्रमाबद्दल अत्यंत प्रशंसोदगार काढून प्रवाशांना जलसेवा देण्याचे पुण्य कर्म करीत असल्याबद्दल आभार व्यक्त केले व भविष्यात ही पुण्यसेवा करण्याचे आवाहन केले. तद्नंतर मंडळातर्फे नवीन होणाऱ्या नियोजित बस स्थानकात शुद्ध व शितल जल आर.ओ. फिल्टर बसवणे जे बाराही महिने सेवा देण्याचे मंडळाच्या वतीने विभाग नियंत्रक यांना आश्वासित करण्यात आले. विभाग नियंत्रकांनी केलेल्या आवाहनानुसार शितल पेयजल सेवेबरोबरच प्रवाशांना थंडगार पाणी बसून पिण्यासाठी व प्रवाशांसाठी बैठक व्यवस्था असणे आवश्यक आहे म्हणून मंडळातील मा अध्यक्ष श्री. विष्णुदास बियाणी यांनी चंपावतीरत्न स्व. विठ्ठलदासजी बियाणी यांच्या स्मरणार्थ, डॉ. राजेंद्र सारडा यांनी स्व. मिठ्ठूलालजी सारडा यांच्या स्मरणार्थ, मा.अधयक्ष सि.ए. गोपाल कासट यांनी स्व. बंकटलालजी कासट यांच्या स्मरणार्थ व मंडळाचे माजी अध्यक्ष स्व. प्रमोद मणियार यांच्या पुण्यस्मरणार्थ आकर्षक अशी आसन व्यवस्था तात्काळ बीड बस स्थानकात उपलब्ध करून दिली. या कार्यक्रमास मंडळाचे सहसचिव राजेंद्र चरखा, ॅड. ओमप्रकाश लोहिया, बालाप्रसाद जाजू, गंगाबिशन करवा, डॉ. राजेंद्र सारडा, बद्रीनारायण मानधने, इंजि. दगडूलाल बंग, डॉ. सुरेंद्र बजाज, भागीरथ चरखा, इंजि. जगदीश मंत्री, ईश्वर चरखा, राजेश मुंदडा, ॅड. विजय कासट, विष्णुदास तापडिया आदि माहेश्वरी प्रगती मंडळाचे पदाधिकारी ,सदस्यांसह बीड बस स्थानकातील अधिकारी, कर्मचारी, परिसरातील व्यापारी बांधव, महिला - पुरुष प्रवाशांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष सुरेंद्र कासट यांनी केले तर सूत्रसंचालन अमर डागा यांनी तसेच आभार प्रदर्शन गोपाल कासट यांनी केले. या कार्यक्रमासाठी मंडळातील उत्स्फूर्तपणे व हिरेरिने यशस्वीतेसाठी मंडळातील सर्व सदस्य जातीने लक्ष

# भवानी अर्बन बँकेला १४३.२३ लक्ष रुपयांचा नफा

## माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्याकडून संचालक मंडळाचे कौतुक

गेवराई ।प्रतिनिधी

भवानी अर्बन को.ऑप.बँक लि, गेवराई या बँकेला सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात करपूर्व १४३.२३ लक्ष रुपयांचा नफा झालेला आहे. बँकेने या आर्थिक वर्षात डिजिटल आर्थिक व्यवहारावर लक्ष केंद्रीत केले आहे. एटीएम सुविधेसह डेबिट कार्ड, मोबाईल बँकिंग, आयएमपीएस, युपीआय, आधार पेमेंट, नॅच (डीबीटी) आदी सुविधा बँकेच्या ग्राहकांना उपलब्ध करून दिल्या आहेत. माजी आ.अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली सचोटीने पारदर्शक कारभार केल्यामुळे बँकेने ग्राहकांमध्ये विश्वासार्हता निर्माण केली आहे. बँकेला या आर्थिक वर्षात मिळालेल्या यशाबद्दल माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित



यांनी संचालक मंडळाचे कौतुक केले आहे.

भवानी अर्बन को.ऑप.बँक लि, गेवराई या बँकेला सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात करपूर्व १४३.२३ लक्ष रुपयांचा नफा झालेला आहे. बँकेचे भागभांडवल २ कोटी ७६ लक्ष आहे. बँकेचा स्वनिधी ६८६.६७ लक्ष रुपये असून मार्च २०२५ अखेर एकुण ठेवी ७० कोटी ९२ लक्ष रुपये आहेत. बँकेने ३४ कोटी ४८ लक्ष रुपयांचे कर्ज वितरण केले असून ३४ कोटी ९७ लक्ष रुपये बँकेची गुंतवणुक आहे, यापैकी २९ कोटी ७२ लक्ष रुपये सरकारी रोख्यात बँकेने गुंतविले आहेत. बँकेचे खेळते भांडवल ८३६०.०५ लक्ष रुपये आहे, बँकेचे ढोबळ अनुउत्पादीत कर्जाचे प्रमाण १.११% असून बँकेचा नेट एनपीए ०.७०% असल्याची माहिती बँकेचे चेअरमन बप्पासाहेब मोटे यांनी दिली.

बँकेला मिळालेल्या यशाबद्दल माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांनी संचालक मंडळाचे कौतुक केले. याप्रसंगी बँकेचे चेअरमन बप्पासाहेब मोटे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर चव्हाण, बप्पासाहेब जाधव, रघुनाथ मोहोळकर, बँकेचे सरव्यवस्थापक भाऊसाहेब नागरे, बीड शाखेचे व्यवस्थापक प्रकाश आमलेकर, माजलगाव शाखेचे व्यवस्थापक मनोज डावकर यांच्यासह बँक कर्मचारी व सभासद उपस्थित होते.

# सी. बी. एस. ई माध्यमाची गुढी उभारून राजस्थानी शाळेत इ. १ लीची नवीन बॅच सुरू

बीड ।प्रतिनिधी

सतत नाविन्याचा ध्यास घेऊन कार्य करणाऱ्या सन १९६६ पासून शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून हजारो विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडवणाऱ्या मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयात आज नवीन शैक्षणिक धोरणानुसार सि. बी. एस. ई माध्यमाची इ.१ ली वर्गाची सुरुवात करण्यात आली.

आकर्षक सजावट , नयनरम्य रांगोळी , सि. बी. एस. ई. ची गुढी , सेल्फी पॉईंट,मुलांना गिफ्ट विद्यार्थ्यांचे स्वागत या सर्व तयारीसह नव्या बॅचचे स्वागत करण्यात आले.राजस्थानी सेवा समाज या संस्थेचे अध्यक्ष विष्णुदास तापडिया, सचिव रामेश्वर कासट यांच्या विशेष उपस्थितीत तसेच माध्यमिक विभागाचे प्राचार्य कसबे सर , उपमुख्याध्यापक लाहोटी सर , पर्यवेक्षक हावळे सर यांच्या उपस्थितीत सरस्वती पूजन करून विद्यार्थ्यांचे




टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. मुलांना पेन्सील, इरेझर गुलाबाचे फुल भेट स्वरूपात देण्यात आले.मुलांनी व पालकांनी स्वागत सोहळ्याचा मनापासून स्वीकार करत सेल्फी व फोटोजचा ही आनंद घेतला. शाळेचे मुख्याध्यापक गिरीश सोहनी यांच्या मार्गदर्शनात तोष्णीवाल , गांधी , लड्डा , बोरा , दोडे , उबाळे ,मंत्री , पारीख सौ. जाजू , बियाळे , ढेपे , जाधव , गरुड , लोणकर , नलवडे , भल्ला , कोठी , केदारी , माने , पोहेकर , सराफ , तोडकर , खोड यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन केले. अजीजपुरा केंद्राच्या केंद्रप्रमुख सौ. माया सोनवणे मॅडम , गटशिक्षणाधिकारी श्री. समदंर खान सर , प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी श्री. भगवान फुलारी सर यांच्या मार्गदर्शन पर सूचनेनुसार तसेच नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी या उद्देशाने राजस्थानी शाळेने पुढाकार घेऊन बीड जिल्ह्यात सर्व प्रथम या वर्गाचे आयोजन केले आहे . शाळेच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल पालकांनी कौतुक व्यक्त केले .

# लक्ष्मीकांत सौन्दत्तीकर यांची संस्कार भारतीच्या अध्यक्षपदी निवड !

बीड ।प्रतिनिधी

सा कला या विमुक्तये हा मुलमंत्र घेऊन कला, क्रीडा, संस्कार, संस्कृती, इतिहास या विषयात कार्य करणाऱ्या संस्कार भारती या संस्थेच्या बीड जिल्हाध्यक्ष पदी जेष्ठ रंगकर्मी लक्ष्मीकांत उर्फ बाळू सौन्दत्तीकर यांची निवड झाली आहे. आगामी काळात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्याचा मानस नूतन जिल्हाध्यक्ष सौन्दत्तीकर यांनी व्यक्त केला आहे.



संस्कार भारती देवगिरी प्रांताची नुकतीच एक बैठक संपन्न झाली. गेल्या अनेक वर्षांपासून अविरतपणे बीड जिल्ह्यात मिळेल ती जबाबदारी पार पाडणारे लक्ष्मीकांत सौन्दत्तीकर यांच्याकडे जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्याचा निर्णय एकमुखाने झाला.संस्कार भारती बीड जिल्हा कार्यकारिणी पुढीलप्रमाणे संरक्षक -वासुदेव व्यंकटराव निलंगेकर, मार्गदर्शक - कुलदीप रेणुकादास धुमाळे अध्यक्ष -लक्ष्मीकांत नारायणराव सौंदत्तीकर,उपाध्यक्ष -श्रीमती प्रज्ञाताई भरतबुवा रामदासी,सुरेश चंद्रभान साळुंके,गणेश यशवंतराव तालखेडकर,सौ मधुरा मिलिंद बाभुळगावकर सचिव -सुरेश देविदासराव भानप,सहसचिव -अनिल रत्नाकरराव कुलकर्णी,गणेश बबनराव स्वामी,कोषप्रमुख -संतोष शामसुंदर पारगावकर,सहकोषप्रमुख -दत्तात्रय केशवराव घोडके,महेश रामराव देशमुख मंचीय कला संयोजक -प्रा. डॉ. राहुल श्रीपादराव पांडव नृत्य -सौ.अनुराधा श्रीपाद चिंचोलकर संगीत -प्रकाश प्रभाकरराव मानुरकर, नामदेव हरीभाऊ साळुंके,रत्नदिप त्रिंबकअप्पा शिगे,शैलेश पुराणिक, दृश्य कला संयोजक -केदारनाथ मारोती बहिरमल,भू अलंकरण -सौ.संगीता संदिकर साहित्य विधा संयोजक -प्रा.डी. एस. कुलकर्णी, साहित्य विधा सहसंयोजक प्रा लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर,प्राचीन कला संयोजक, प्रा. जोगेंद्र रामराव गायकवाड,प्रचार व प्रसिद्धी प्रमुख दिनेश लिंबेकर कार्यकारणी सदस्य,जगदीश हरिभाऊ पिंगळे,ड.श्री.श्रीराम देशपांडे.

# बीड सांगवी महादेव दरा देवराई येथे दर्जेदार वनराई निर्मिती करणार चांगला श्वास घेणारा जगातील सर्वात श्रीमंत माणूस..

आष्टी (प्रतिनिधी)

मला माझ्या आयुष्यात हे लक्षात आले आहे की, जगात आई असणे आणि वृक्ष असणे या दोन गोष्टी सारख्या असून आई नसती तर आपण नसतो आणि वृक्ष नसते तर जगातला कोणताही व्यक्ती शिल्लक राहिला नसता असे महत्त्वपूर्ण प्रतिपादन प्रसिद्ध सिने अभिनेते आणि देवराई चे निर्माते संस्थापक सयाजी शिंदे यांनी केले.

आष्टी तालुक्यातील बीडसांगवी येथील महादेव दरा या ठिकाणी देवराई संस्थेमार्फत विविध प्रकारचे वृक्ष लागवड करण्यात येणार असून या प्रकल्पाचे भूमिपूजन करताना ते बोलत होते. यावेळी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे विधानसभा सदस्य आमदार सुरेश धस, महादेव दरा देवस्थानचे मठाधिपती कल्याण महाराज कोल्हे, सरपंच परिषदेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, जिल्हा वन अधिकारी अमोल गरकळ,सरपंच नंदकिशोर करांडे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना सयाजी शिंदे म्हणाले की, सध्या पर्यावरणाचा असमतोल झाल्यामुळे श्वास घेणेदेखील मुश्किल झाले असून चांगला श्वास घेणारा माणूस हा जगातील सर्वात श्रीमंत माणूस आहे असे मी समजतो त्यामुळे जगात आई आणि वृक्ष या दोघांचे अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे सांगत ते म्हणाले की, हे रचनात्मक



कार्य असून त्यामुळे देवराई च्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रभर याविषयी आपण काम करत आहोत आमदार सुरेश धस यांनी याविषयी संपर्क केल्यामुळे मी या ठिकाणी आलो असून आपण माणूस म्हणून सर्व गोष्टींकडे पाहिले पाहिजे असे सांगत जात धर्म पंथ विरहित रचनात्मक कार्य आपण करत असून आष्टी तालुक्यातील महादेव दरा देवराई च्या माध्यमातून या ठिकाणी अत्यंत दर्जेदार वृक्षांची लागवड करून त्यामध्ये आंबा,चिंच,विविध प्रकारचे गवते यासारख्या देशी वृक्षांची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यात येईल ज्या देशांमध्ये या प्रकारची झाडे आहेत तो देश जगात श्रीमंत देश समजला जाणार आहे महादेव जरा वन देवराई हेदेखील अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प समजून पशुपक्ष्यांसाठी विघातक असलेल्या नावाची वनस्पती चे समूळ उच्चाटन करून या ठिकाणी दर्जेदार वृक्षांची लागवड करण्यात येईल सुरुवातीला एप्रिल महिन्यामध्ये देवराई संस्थेचे तज्ञ येऊन या ठिकाणी पाहणी करतील सर्वेक्षण करतील आणि त्यानंतर प्रत्यक्ष काम सुरुवात होणार आहे.बीडसांगवी येथील महादेव दरा या ठिकाणी देवराई च्या माध्यमातून पशुपक्ष्यांसाठी विषारी ठरणाऱ्या ग्लॅरीसिडिया या वनस्पतीचे समूळ उच्चाटन करण्यात येणार असून देशी वृक्ष असलेल्या आंबा चिंच मोठ्या प्रमाणावर झाडांची लागवड करण्यात येणार आहे.

बीडसंगवी येथे माझ्या आग्रहास्तव महादेव दरा शिवारात आलेले प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांच्या कडे मी मागणी करताच देवराईच्या माध्यमातून जवळपास २५ एकरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले जाणारा आहे.याचा वृक्षप्रेमी असल्याने मनस्वी आनंद होत आहे. या देवराई वृक्षारोपण करत प्रभावीपणे अंमलबजावणी करून स्वतः जातीने लक्ष देत जबाबदारीने राबवणार असल्याचे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी यावेळी बोलताना केलेह. भ. प कल्याण कोल्हे महराज सेवा सेवा सोसायटी चेअरमन सुभाष गणगे, रणजीत ढोबळे,मल्हारी करांडे,जालिंदर नरवडे, बाबासाहेब नरवडे, विजय डुकरे, राजु करांडे विजय जाधव सतोष नरवडे, उद्धव नरवडे, ललेश नरवडे, बाबासाहेब शिंदे,जाकीर शेख, रफिक शेख,संजय डुकरे,रामराव पाटील, रामराव शेळके,शहादेव चव्हाण,सोमनाथ घुले, गोकुळ नरवडे, बारकु ढोबळे, कल्याण मोहळकर,आसाराम पाटील, नामदेव जाधव, दादासाहेब साळवे,पोपट करडुळे, महादेव करडुळे, लहु करडुळे, बापुराव गणगे, रामदास गणगे, महादेव गणगे, महादेव शेळके,हिराजी बाबणे आदीसह बीडसांगवी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी स्वत:चीच दुकाने थाटली ?

## निकृष्ट दर्जाच्या निविष्ठा शेतकऱ्यांच्या माथी मारल्याने शेतकरी संकटात आ.सुरेश धस यांचा गंभीर आरोप

आष्टी (प्रतिनिधी)

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातील काही अधिकारी कर्मचाऱ्यांनी बेकायदेशीरपणे नातेवाईक आणि मित्रांच्या नावे कृषी निविष्ठा उत्पादक कंपन्या आणि विक्री केंद्र सुरू केली असून या जबाबदार अधिकाऱ्यांची माहिती आपण मागितली असून या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याची मागणी करणार आहोत अधिकाऱ्यांनी स्वतःच्याच कंपन्या स्थापन करून निकृष्ट दर्जाच्या निमित्त शेतकऱ्यांच्या माती मारल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होऊन शेतकऱ्यांना संकटाला सामोरे जावे लागल्यामुळे शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ आली मात्र अधिकारी मालामाल होण्यासाठी प्रयत्न करत आहेत हे महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैवी आहे त्यामुळे या सर्व अधिकाऱ्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्याची आपण मागणी करणार आहोत असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले आष्टी येथील विशेष पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले,महाराष्ट्रील कृषि क्षेत्र वरचेवर संकटात असल्याने महाराष्ट्रील शेतकरी आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त होत आहे. शेतकरी आत्महत्या करण्याच्या पाठीमागे निकृष्ठ दर्जाची खते, बियाणे, औषधे आणि किटकनाशाके, सूक्ष्म मुलद्रव्ये, प्रजैवके (झत्रळ), झठजच् इत्यादीचा पुरवठा कंपन्या व कृषि विभागातील अधिकारी शेतकऱ्यांच्या माथी मारत आहेत. तसेच कंपन्या निरनिराळे प्रलोभने देऊन शेतकऱ्यांना मुख्य खते (युरीया, डीएपी इत्यादी) सोबत लिंकिंग मध्ये ही निकृष्ठ दर्जाची खते घेण्यास भाग पडत आहेत. त्यासाठी गाव पातळीवरील कृषि निविष्ठा विक्री केंद्रे व कंपनी पातळीवरील विक्री काम पाहणारे किंवा उत्पादन केलेला माल खपविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत आणि शेतकरी कर्ज काढून उत्पन्न जास्त यईल या आशेने या निविष्ठा घेत आहेत, गेल्या १० वर्षा पासून चढत्या क्रमाने बोगस खते, बियाणे, औषधे उत्पादान करणाऱ्या कंपन्यांचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे शेतकरी वर्गाचा उत्पादन खर्च वाढत आहे. हवामान व पावसाचे अनिश्चिततेमुळे अपेक्षित उत्पादन शेतीमधून मिळत नाही उत्पन्न आल्यानंतर त्याचा बाजारात योग्य भाव मिळत नाही, त्यामुळे शेतकरी आत्महत्याचे प्रमाण महाराष्ट्रामध्ये वाढू लागलेले आहे ही एक वस्तुस्थिती आहे.



निकृष्ट दर्जाच्या या खते बियाणे औषधे आणि निविष्ठा उत्पादन करणाऱ्या कंपन्यांवर योग्य दर्जा आणि गुणवत्ता पूर्ण निविष्ठा उत्पादन होणार आहे याचे नियंत्रण करण्याचे मुख्य काम कृषी विभागाचे आहे. एका जिल्ह्यामध्ये कृषी विभागामार्फत गुणनियंत्रणाच्या कामासाठी प्रत्येक तालुक्याला कार्यरत असणारे तालुका कृषी अधिकारी, पंचायत समिती मधील कृषी अधिकारी, उपविभागीय पातळीवर उपविभागीय कृषी अधिकारी, जिल्हा पातळीवर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जिल्ह्यात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या कार्यालयातील कृषी उपसंचालक व पूर्णवेळ जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा परिषदेकडील कृषी विकास अधिकारी आणि जिल्हा परिषदेकडील मोहीम अधिकारी, विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयातील विभागीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, विभागीय तंत्र अधिकारी गुन नियंत्रण इत्यादी अधिकारी कर्मचारी काम करीत आहेत.

साधारणपणे आमच्या बीड जिल्ह्यामध्ये एकूण ११ तालुके आहेत. त्यामध्ये ११ तालुका कृषी अधिकारी, ११ पंचायत समितीचे कृषी अधिकारी, ३ उपविभागीय कृषी अधिकारी, जिल्हा परिषदेचे मोहीम अधिकारी, कृषी विकास अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, त्यांच्या कार्यालयातील कृषी उपसंचालक आणि पूर्णवेळ जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक असे मिळून सुमारे ३० एकट्या बीड जिल्ह्यात क्वालिटी कंट्रोल इन्स्पेक्टर म्हणून कार्यरत आहेत. विभागीय कृषी सहसंचालक छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील तंत्र अधिकारी गुणनियंत्रण, विभागीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक हे सुद्धा क्वालिटी कंट्रोल इन्स्पेक्टर आहेत.

या सर्वांनी बदली करीता मंत्री कार्यालयात मोठ्या प्रमाणात रकमा देऊन बदली करून घेतली असल्याने ३ वर्षात १० पट रक्कम वसूल करण्याचा हेतूने हे सर्व क्वालिटी कंट्रोल इन्स्पेक्टर स्वतःचे काम सोडून आणि शेतकऱ्याला गुणवत्ता पूर्ण निविष्ठा पुरवठा करण्यासाठी निरीक्षण करण्याचे सोडून हप्ते गोळा करण्यामध्ये गुंतलेले असतात. विक्री केंद्रे तपासणीला गेल्यावर तपासणी फी, नमुना काढल्यास त्याची फी वेगळी असते, या सर्व हप्तेखोरपणामुळे कृषी निविष्ठा विक्री केंद्राचे मालक शेतकऱ्याला देण्यात येणाऱ्या निविष्ठाच्या किमतीपेक्षा जास्तीचे कमिशन (४०% ते ५०%) मिळविण्याच्या हेतूने बोगस कंपन्यांचा माल खपविण्याकडे त्यांचा कल जास्त असतो. त्यामुळे शेतकऱ्यांना गुणवत्ता पूर्ण निविष्ठा मिळत नाहीत.

याबाबत मी माहिती घेतली असता बहुतांश अधिकारी म्हणजेच संचालकापासून ते जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकापर्यंत या अधिकाऱ्यांचे बोगस निविष्ठा उत्पादन करणाऱ्या कंपन्यांमध्ये त्यांचा वाटा आहे किंवा त्याच्या रक्तातले नातेवाईक म्हणजेच अप्रत्यक्षरीत्या स्वतःच्याच कंपन्या स्थापन करून त्या कंपन्यांमधला माल याच कृषी विक्री केंद्रांस घेण्यास दबाव आणतात व मोठ्या कंपन्यांच्या गुणवत्ता पूर्ण निविष्ठासोवत या बोगस निविष्ठा लिंकिंग मध्ये विकण्याची बळजबरी केली जाते.

खात्यातील अधिकाऱ्यांनीच कंपन्या सुरू केलेल्या असल्यामुळे, या कंपन्यांमार्फत उत्पादित झालेल्या खते, बियाणे, औषधे, कीटकनाशके इत्यादींचे नमुने काढले जात नाहीत. कृषि निविष्ठा विक्री केंद्रांना अधिकाऱ्यांच्या अप्रत्यक्षरीत्या मालकीच्या असणाऱ्या कंपन्या मार्फतच उत्पादित झालेल्या निविष्ठांचा माल विकत घेण्यासाठी जबरदस्ती केली जाते.

कोल्हापूर संभागातील विभागीय कृषि सहसंचालक उमेश पाटील यांनी त्यांच्या पत्नी आणि मुलाच्या नावे कृषि सेवा बायो ऑरगॅनिक फर्टीलायझर प्रायव्हेट लिमिटेड या नावाची कंपनी स्थापन केलेली आहे. महाराष्ट्र राज्यातील माझ्याकडे मंत्रालयातून आलेल्या तक्रारीतून महाराष्ट्रातून परवाना घेण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक कंपनीकडून कलेक्शन किरण जाधव कडे केले जात असल्याचे समजले किरण जाधव याने तंत्र अधिकारी निविष्ठा व गुणनियंत्रण विभागात गेल्या १५ वर्षा पेक्षा जास्त काळ गुणनियंत्रण विभागातच काम केले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# नववर्षाच्या स्वागताला संस्कार भारतीने उलगडला पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा जीवनपट

बीड ।प्रतिनिधी

अठ्ठावीस वर्षाची परंपरा लाभलेल्या कनकालेश्वर महोत्सवात यंदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्रावरील कुलदीप धुमाळे लिखित कर्तृत्वशालिनी राजयोगिनी पुण्यश्लोक अहिल्या ही नाटिका सादर करण्यात आली. तर विख्यात पखवाजवादक कृष्णा सोळंके यांनी पखावजवर शिवतांडव हे विविध तालांचे अनोखे वादन सादर केले. लोककलावंत बबनमहाराज घुगे यांनी गवळणी सादर केल्या.तर साई नृत्यालयाच्या विद्यार्थिनींनी तरंगत्या रंगमंचावर भरत नाट्यम सादर केले.

प्रारंभी कनकालेश्वर महोत्सवाचे उद्घाटन युवा नेते योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते आणि पश्चिम क्षेत्र प्रमुख चंद्रकांत घरोटे, भरत लोळगे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि स्नेहल पाठक यांच्या अध्यक्षेतेखाली दीप प्रज्वलित करून करण्यात आले ,यावेळी संस्कार भारतीचे माजी महामंत्री कुलदीप धुमाळे यांचा अमृत महोत्सवी सत्कार करण्यात आला.व्यासपीठावर प्रमोद वझे,महेश वाघमारे, डॉ.विद्यासागर पाटांगणकर,सतीश महामुनी ,शेषनाथ वाघ उपस्थित होते. प्रास्ताविक प्रांत मंत्री प्रमोद वझे यांनी केले. यावेळी संस्कार भारती, बीडच्या दिनदर्शिकेचे आणि दैनंदिनीचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.यावेळी योगेश क्षीरसागर यांनी आगामी काळात हा मोहोत्सव अधिक भव्यदिव्य पध्दतीने साजरा करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे वचन दिले तर कुलदीप धुमाळे यांनी सत्काराला उत्तर देतांना आपण संस्कार भारतीमुळे घडलो अशी कृतज्ञता व्यक्त केली.



संस्कार भारती बीड शाखेच्या वतीने गेल्या २८ वर्षांपासून कनकालेश्वर महोत्सव साजरा केला जातो चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात पाडव्याच्या दिवशी मराठी नववर्षाचे स्वागत आगळ्यावेगळ्या पद्धतीने कंकालेश्वर मंदिराच्या जलाशयासमोर उपस्थित नागरिकांनी कनकालेश्वरावर पुष्पवृष्टी करून नववर्षाचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरवात नृत्यगुरू अनुराधा चिंचोलकर यांच्या साई नृत्यालयाच्या विद्यार्थिनींच्या तरंगत्या रंगमंचावरील भरत नाट्यमने झाली.राज योगिनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे यंदाचे त्रिशताब्दी जन्मवर्षाच्या निमित्ताने त्यांच्या जीवनपटावर आधारित एक नाटिका संस्कार भारती बीडच्या वतीने सादर करण्यात आली. या नाटिकेत स्नेहा परगावकर, कौमुदी रुईकर यांनी अहिल्यादेवीच्या भूमिका साकारल्या.या सादरीकरणास रसिकांनी मोठा प्रतिसाद दिला. तसेच कृष्णा साळुंखे यांनी कमी वेळेत अधिक परिणामकारक पखवाज वादन सादर करून उपस्थितांना तालावर डोलायला लावले.एकाच गवळणीत सात विविध रंगाच्या साड्या लीलया बदलत बबनमहाराज घुगे यांनी सादर केलेली 'सात रंगाच्या सात गवळणी ' ही गवळण रसिकांनी डोक्यावर घेत टाळ्यांचा कडकडाट करून प्रतिसाद दिला त्यांना हार्मोनियमवर भरत लोळगे आणि तबल्यावर प्रकाश मानूरकर यांनी साथ दिली. भारतमाता टाळ नृत्य समूहाने अनोखे टाळनृत्य सादर करून उपस्थित रसिकांच्या कान आणि डोळे तृप्त केले.नामदेव साळुंके यांच्या विद्यार्थ्यांनी प्रारंभी संस्कार भारती गीत सादर केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश साळुंके आणि गणेश तालखेडकर यांनी केले.

मोहोत्सव यशस्वी करण्यासाठी संस्कार भारती बीडचे अध्यक्ष लक्ष्मीकांत सौंदत्तीकर,संतोष पारंगावकर, वासुदेवराव निलंगेकर,डॉ.राहुल पांडव,

## रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनी लि. यांना ग्राहक आयोग बीड यांचे नुकसान भरपाई देण्याचे आदेश

बीड ।प्रतिनिधी

मशिनचे पार्ट चोरीस गेल्याबाबत विमा नुकसान भरपाई देण्यास नकार दिल्यामुळे रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनी लि. यांना ग्राहक आयोग बीड यांचे ५ लाख ६४ हजार रुपये रक्कम नुकसान भरपाई तसेच तक्रारीचा खर्च मानसिक व शारिरीक त्रासापोटी ५० हजार रुपये देण्याचे आदेश दिल्याने सदरील विमा कंपनीला आयोगाचा चांगलाच दणका बसला आहे.

याबाबत माहिती अशी की, अंबिका रिचार्ज अॅन्ड सोल्युशन्स चे मालक यांनी आपल्या होरीझॉन्टल डायरेक्शन ड्रिलिंग मशीनसाठी विमा घेतलेला होता व सदरील मशीनवर अॅक्सीस बँकेचे कर्ज घेतलेले होते सदरील मशीनमधील दि.१५ नोव्हेंबर २०२३ रोजी काही पार्ट्स व बॅटर्या चोरीला गेल्या त्याची एकूण किंमत ५ लाख ६४ हजार रुपये इतकी होती त्यावर तक्रारदार यांनी विमा कंपनीला विमा नुकसान भरपाई मागितली असता त्यांनी मशीनचे पार्ट्स विम्यामध्ये कव्हर होत नाहीत असे सांगून विमा फेटाळला. त्यामुळे तक्रारदार यांनी जिल्हा व सत्र न्यायालयातील अॅड.बी.डी.सारडा यांच्या मार्फत ग्राहक आयोग बीड येथे ग्राहक तक्रार क्रमांक २७४/२०२४ अन्वये तक्रार दाखल करुन विमा कंपनीस नोटीस दिली. सदरील नोटीस मिळाल्यानंतर विमा कंपनी हजर राहिली नाही परंतू बँकेने हजर होवून आपले म्हणणे मांडले तसेच विमा कंपनीविरुध्द एकतर्फी आदेश पारित करण्यात आला.

सदरील प्रकरणाची सुनावणी होवून अॅड.बी.डी.सारडा यांनी तक्रारदाराची बाजू भक्कमपणे मांडल्यामुळे आयोगाने सदरील तक्रार मान्य करुन विमा कंपनीला ५ लाख ६४ हजार रुपये नुकसान भरपाई तसेच तक्रारीचा खर्च व मानसिक व शारिरीक त्रासापोटी ५० हजार रुपये मुदतीत देण्याचे सांगितले तसेच तक्रार दाखल दिनांकापासून त्यावर द.सा.द.शे.८% दराने व्याज देण्याचे आदेशित केले आहे.

## लक्ष्मीकांत सौन्दत्तीकर यांची संस्कार भारतीच्या अध्यक्षपदी निवड !

बीड ।प्रतिनिधी

सा कला या विमुक्तये हा मुलमंत्र घेऊन कला, क्रीडा, संस्कार, संस्कृती, इतिहास या विषयात कार्य करणाऱ्या संस्कार भारती या संस्थेच्या बीड जिल्हाध्यक्ष पदी जेष्ठ रंगकर्मी लक्ष्मीकांत उर्फ बाळू सौन्दत्तीकर यांची निवड झाली आहे. आगामी काळात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्याचा मानस नूतन जिल्हाध्यक्ष सौन्दत्तीकर यांनी व्यक्त केला आहे.



संस्कार भारती देवगिरी प्रांताची नुकतीच एक बैठक संपन्न झाली. गेल्या अनेक वर्षांपासून अविरतपणे बीड जिल्ह्यात मिळेल ती जबाबदारी पार पाडणारे लक्ष्मीकांत सौन्दत्तीकर यांच्याकडे जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्याचा निर्णय एकमुखाने झाला.संस्कार भारती बीड जिल्हा कार्यकारिणी पुढीलप्रमाणे संरक्षक -वासुदेव व्यंकटराव निलंगेकर, मार्गदर्शक - कुलदीप रेणुकादास धुमाळे अध्यक्ष -लक्ष्मीकांत नारायणराव सौंदत्तीकर,उपाध्यक्ष -श्रीमती प्रज्ञाताई भरतबुवा रामदासी,सुरेश चंद्रभान साळुंके,गणेश यशवंतराव तालखेडकर,सौ मधुरा मिलिंद बाभुळगावकर सचिव -सुरेश देविदासराव भानप,सहसचिव -अनिल रत्नाकरराव कुलकर्णी,गणेश बबनराव स्वामी,कोषप्रमुख -संतोष शामसुंदर पारगावकर,सहकोषप्रमुख -दत्तात्रय केशवराव घोडके,महेश रामराव देशमुख मंचीय कला संयोजक -प्रा. डॉ. राहुल श्रीपादराव पांडव नृत्य -सौ.अनुराधा श्रीपाद चिंचोलकर संगीत -प्रकाश प्रभाकरराव मानुरकर, नामदेव हरीभाऊ साळुंके,रत्नदिप त्रिंबकअप्पा शिंगे,शैलेश पुराणिक, दृश्य कला संयोजक - केदारनाथ मारोती बहिरमल,भू अलंकरण -सौ.संगीता संदिकर साहित्य विधा संयोजक -प्रा.डी. एस. कुलकर्णी, साहित्य विधा सहसंयोजक प्रा लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर,प्राचीन कला संयोजक, प्रा. जोगेंद्र रामराव गायकवाड,प्रचार व प्रसिद्धी प्रमुख दिनेश लिंबेकर कार्यकारणी सदस्य,जगदीश हरिभाऊ पिंगळे,ड.श्री.श्रीराम देशपांडे.

## माहेश्वरी प्रगती मंडळाचा स्तुत्य उपक्रम :रखरखत्या उन्हाच्या चाहूलात बीड बस स्थानकात शीतल जलपेयची व्यवस्था

बीड ।प्रतिनिधी

माहेश्वरी प्रगती मंडळ बीडच्या वतीने मागील तीन दशकापासून बीड शहरात अनेक समाज उपयोगी सामाजिक, धार्मिक, वैद्यकीय, शैक्षणिक, पर्यावरणपूरक व सांस्कृतिक कार्य चालू असून मागील अनेक वर्षापासून ग्लोबल वार्निंगमुळे आपल्याकडे उन्हाची दाहकता वाढत आहे. यावर्षी मार्च महिन्यातच उष्णतेचे चटके बसण्यास सुरुवात झाली असून तापमान ४२ अंश सेल्सिअसपर्यंत गेले आहे. बीड बस स्थानकात दररोज हजारो प्रवासी उन्हाची लाही लाही सहन करीत प्रवास करीत असतात. बस स्थानकात व स्थानकापासून जवळपास ४० किलोमीटर अंतरापर्यंत मोफत व शुद्ध जल पेयाची व्यवस्था नाही तसेच मोजकेच प्रवासी बाटलीचे पाणी पिऊ शकतात त्यामुळे बसस्थानकातील अनेक प्रवाशांनी व व्यवस्थापन समितीने मोफत शितल ,शुद्ध जलपेयाची व्यवस्था करण्याचे आवाहन केले.

तद्नुसार मागील वर्षी प्रमाणे यावर्षीही रविवार दि.३० मार्च २०२५ रोजी गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर अत्यंत सुसज्ज असलेली शुद्ध, थंड शीतल व मोफत पेयजल पिण्याच्या पाण्याची व्यवस्था माहेश्वरी प्रगती मंडळाद्वारे करण्यात आली. बीड बस स्थानकातील मोफत पानपोईचे उद्घाटन मा.श्री. दिलीपजी धूत (मा. संचालक ,महाराष्ट्र पर्यटन मंडळ, मुंबई), संपादक श्री. दिलीपजी खिस्ती (दैनिक लोकप्रश्न), सौ. अनुजाताई दुसाने (विभागीय नियंत्रक बीड), श्री संतोषजी डोके




(आगार प्रमुख) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी माहेश्वरी प्रगती मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र कासट, सचिव जुगलकिशोर बियाणी, ज्येष्ठ सदस्य सी.ए. सुरेशजी लड्डा, संपर्कप्रमुख विष्णुदास बियाणी, सि.ए. गोपाल कासट, सुरज लाहोटी, उपाध्यक्ष संतोष टवाणी, बाळकिसन बियाणी यांनी मंडळाच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

सर्व प्रमुख अतिथी मान्यवर व मंडळाचे सर्व सदस्यासमवेत फीत कापून व श्रीफळ वाढवून यथोचित मोफत पाणपोईचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी मंडळाच्या उपक्रमाबद्दल अत्यंत प्रशंसोदगार काढून प्रवाशांना जलसेवा देण्याचे पुण्य कर्म करीत असल्याबद्दल आभार व्यक्त केले व भविष्यात ही पुण्यसेवा करण्याचे आवाहन केले. तद्नंतर मंडळातर्फे नवीन होणाऱ्या नियोजित बस स्थानकात शुद्ध व शितल जल आर.ओ. फिल्टर बसवणे जे बाराही महिने सेवा देण्याचे मंडळाच्या वतीने विभाग नियंत्रक यांना आश्वासित करण्यात आले. विभाग नियंत्रकांनी केलेल्या आवाहनानुसार शितल पेयजल सेवेबरोबरच प्रवाशांना थंडगार पाणी बसून पिण्यासाठी व प्रवाशांसाठी बैठक व्यवस्था असणे आवश्यक आहे म्हणून मंडळातील मा अध्यक्ष श्री. विष्णुदास बियाणी यांनी चंपावतीरत्न स्व. विठ्ठलदासजी बियाणी यांच्या स्मरणार्थ, डॉ. राजेंद्र सारडा यांनी स्व. मिठ्ठूलालजी सारडा यांच्या स्मरणार्थ, मा.अधयक्ष सि.ए. गोपाल कासट यांनी स्व. बंकटलालजी कासट यांच्या स्मरणार्थ व मंडळाचे माजी अध्यक्ष स्व. प्रमोद मणियार यांच्या पुण्यस्मरणार्थ आकर्षक अशी आसन व्यवस्था तात्काळ बीड बस स्थानकात उपलब्ध करून दिली. या कार्यक्रमास मंडळाचे सहसचिव राजेंद्र चरखा, ॅड. ओमप्रकाश लोहिया, बालाप्रसाद जाजू, गंगाबिशन करवा, डॉ. राजेंद्र सारडा, बद्रीनारायण मानधने, इंजि. दगडूलाल बंग, डॉ. सुरेंद्र बजाज, भागीरथ चरखा, इंजि. जगदीश मंत्री, ईश्वर चरखा, राजेश मुंदडा, ॅड. विजय कासट, विष्णुदास तापडिया आदि माहेश्वरी प्रगती मंडळाचे पदाधिकारी ,सदस्यांसह बीड बस स्थानकातील अधिकारी, कर्मचारी, परिसरातील व्यापारी बांधव, महिला - पुरुष प्रवाशांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष सुरेंद्र कासट यांनी केले तर सूत्रसंचालन अमर डागा यांनी तसेच आभार प्रदर्शन गोपाल कासट यांनी केले. या कार्यक्रमासाठी मंडळातील उत्स्फूर्तपणे व हिरेरिने यशस्वीतेसाठी मंडळातील सर्व सदस्य जातीने लक्ष देत असून माहेश्वरी प्रगती मंडळाच्या या सामाजिक उपक्रमांचे प्रवासी बांधवांनी मुक्तकंठाने प्रशंसोद्गार काढले.

## प्रहारच्या महिला जिल्हा कार्याध्यक्षपदी अर्चना नाथ तर संपर्कप्रमुख पदी मनिषा पांढरे यांची निवड

बीड ।प्रतिनिधी

प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीडच्या महिला जिल्हा कार्याध्यक्षा म्हणून श्रीमती अर्चना बाबासाहेब नाथ, सहशिक्षिका जि. प. के. प्रा. शा. पारगाव जो.ता. आष्टी जि.बीड यांची तर जिल्हा संपर्कप्रमुख पदी श्रीमती पांढरे मनिषा रंगनाथ, सहशिक्षिका,जि प. प्रा शा मुस्लिम वस्ती केंद्र कन्या शिरूर कासार यांची निवड जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी केली असल्याची माहिती जिल्हा कार्याध्यक्ष ओमप्रकाश आनेराव यांनी दिली आहे.





विशेषतः शिक्षिका भगिनींना शिक्षण विभाग, बदली, वेतन, वैद्यकीय परिपुर्ती देयके,भनिनि इत्यादी माहिती थेट मिळावी, यासाठी प्रहार दररोज विविध माहिती, अपडेट देत असते, असे यावेळी जिल्हा प्रवक्तृया निर्मला वाघमारे व कार्याध्यक्षा सय्यद मुमताज यांनी सांगितले आहे. जिल्हाभरातील शिक्षिकांना सर्वार्थाने सक्षम करण्यासाठी प्रहार आज गुढीपाडवा हा मुहूर्त साधत महिला पदाधिकारी यांची जिल्हाभरात निवड करण्यास सुरुवात करत आहे. याच अभियानाची एक चांगली सुरुवात म्हणून आज उच्चशिक्षित,आदर्श, विद्यार्थी प्रिय, उपक्रमशील व तंत्रस्नेही शिक्षिका श्रीमती अर्चना नाथ यांची जिल्हा महिला कार्याध्यक्षा म्हणून तर श्रीमती मनिषा पांढरे यांची जिल्हा संपर्कप्रमुख पदी निवड करण्यात आली आहे.

बीड जिल्ह्यामध्ये मागील दहा वर्षांपासून अत्यंत उत्कृष्ट असे शैक्षणिक व सामाजिक कार्य करणाऱ्या या दोन्ही पदाधिकारी यांच्या निवडीमुळे महिला शिक्षकांचे प्रश्न निकाली काढण्यासाठी मोठी मदत होणार आहे,असे जिल्हा संघटिका श्रीमती संध्या टेकाळे,प्रविणा कांबळे, गुड्डी घाडगे मॅडम यांनी मत व्यक्त केले आहे. दोन्ही पदाधिकारी यांचे प्रहार परिवारात मनःपूर्वक स्वागत करण्यात येत असून, या निवडीबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करुन त्यांना पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा प्रहार पदाधिकारी जिल्हा सचिव- अविनाश काळे, कोषाध्यक्ष- उत्तरेश्वर बजगुडे, उर्दू विभाग प्रमुख- मिर्झा हसनात, जिल्हा कार्याध्यक्ष -ओमप्रकाश आणेराव, प्रहार पेन्शनर सेल प्रमुख- सुरेश प्रधान व राजेसाहेब चव्हाण, आरोग्य विभाग प्रमुख गोविंद गोचडे, प्रहार एज्युकेशन सेल प्रमुख अरविंद चौधरी व अण्णासाहेब खंडागळे, प्रहार जुनी पेन्शन सेल प्रमुख -सुदर्शन काळे ,प्रविणा कांबळे , प्रहार तक्रार निवारण सेलचे प्रमुख- पी. आर. खेडकर व पुरषोत्तम खेत्रे ,कार्याध्यक्ष - नवनाथ धोंगडे , सय्यद मुमताज , वैशालीताई आकुसकर, सहसचिव अंबादास बागलाने, जिल्हा प्रवक्ता- पद्माकर आंधळे , मन्मथ अरबने, किरण सारुक , निर्मलाताई वाघमारे जिल्हा उपाध्यक्ष- कादरी कदीर (शिक्षकेतर विभाग), पी. आर. खेडकर,महादेव गीते, शामराव मिरगे ,दिपक देशमुख,प्रल्हाद फड, शेख ऐनोद्दीन , वर्षाराणी महाजन समन्वयक - संजय पाटील, शामराव आघाव, अण्णासाहेब खंडागळे, शिवाजी झेंडेकर संघटक- श्रीमती प्रविणाताई कांबळे, बापूसाहेब शिंदे , अशोक सप्रे, सुरेश वाघमारे, संजय लोखंडे संपर्कप्रमुख- संध्याताई टेकाळे, वसंत तरकसबंद, राजाराम लकडे, राजेंद्र बेले, पांडुरंग जोगदंड , शहादेव मराठे , विठ्ठल सानप,सहसचिव - अंबादास बागलाने , महेश भट, संजय कुलकर्णी, बीड तालुकाध्यक्ष - सय्यद जिलानी, वडवणी तालुकाध्यक्ष -संगीता तिडके, शिरूर कासार तालुकाध्यक्ष- दत्तात्रय गाडेकर , गेवराई तालुकाध्यक्ष - बाळासाहेब गावडे, माजलगाव तालुकाध्यक्ष लक्ष्मण सरवदे, पाटोदा तालुकाध्यक्ष -मुकींद गाडे, आष्टी तालुकाध्यक्ष भाऊसाहेब काळे, धारूर तालुकाध्यक्ष- हनुमंत मंत्रे, परळी तालुकाध्यक्ष - कमलाकर कामाळे, अंबेजोगाई तालुकाध्यक्ष- बाळासाहेब पिसुरे, केज तालुकाध्यक्ष - प्रभूकांत सोन्ने, उर्दू विभाचे सय्यद अस्लम हबीब सर, बीड तालुका कार्याध्यक्ष (उर्दू विभाग) सय्यद अर्शद अली मेहबूब, प्रा. पदवीधर वडवणी तालुका कार्याध्यक्ष पदी (उर्दू विभाग) ,शेख इलियास सर शिरुर तालुका उपाध्यक्ष , फारुकी रईसोद्दीन अनिसोद्दिन शिरूर तालुका कार्याध्यक्ष शेख फैजल रेहमान अब्दुल सईद प्रा पदवीधर यांची गेवराई तालुका कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

## बीड सांगवी महादेव दरा देवराई येथे दर्जेदार वनराई निर्मिती करणार

### चांगला श्वास घेणारा जगातील सर्वात श्रीमंत माणूस.. प्रसिद्ध सिने अभिनेते सयाजी शिंदे
### देवराई अधिक प्रभावीपणे राबविणार- आ.सुरेश धस

आष्टी (प्रतिनिधी)

मला माझ्या आयुष्यात हे लक्षात आले आहे की, जगात आई असणे आणि वृक्ष असणे या दोन गोष्टी सारख्या असून आई नसती तर आपण नसतो आणि वृक्ष नसते तर जगातला कोणताही व्यक्ती शिल्लक राहिला नसता असे महत्त्वपूर्ण प्रतिपादन प्रसिद्ध सिने अभिनेते आणि देवराई चे निर्माते संस्थापक सयाजी शिंदे यांनी केले.

आष्टी तालुक्यातील बीडसांगवी येथील महादेव दरा या ठिकाणी देवराई संस्थेमार्फत विविध प्रकारचे वृक्ष लागवड करण्यात येणार असून या प्रकल्पाचे भूमिपूजन करताना ते बोलत होते. यावेळी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे विधानसभा सदस्य आमदार सुरेश धस, महादेव दरा देवस्थानचे मठाधिपती कल्याण महाराज कोल्हे, सरपंच परिषदेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, जिल्हा वन अधिकारी अमोल गरकळ,सरपंच नंदकिशोर करांडे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना सयाजी शिंदे म्हणाले की, सध्या पर्यावरणाचा असमतोल झाल्यामुळे श्वास घेणेदेखील मुश्किल झाले असून चांगला श्वास घेणारा माणूस हा जगातील सर्वात श्रीमंत माणूस आहे असे मी समजतो त्यामुळे जगात आई आणि वृक्ष या दोघांचे अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे सांगत ते म्हणाले की, हे रचनात्मक कार्य असून त्यामुळे देवराई च्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रभर याविषयी आपण काम करत आहोत आमदार सुरेश धस यांनी याविषयी संपर्क केल्यामुळे मी



या ठिकाणी आलो असून आपण माणूस म्हणून सर्व गोष्टींकडे पाहिले पाहिजे असे सांगत जात धर्म पंथ विरहित रचनात्मक कार्य आपण करत असून आष्टी तालुक्यातील महादेव दरा देवराई च्या माध्यमातून या ठिकाणी अत्यंत दर्जेदार वृक्षांची लागवड करून त्यामध्ये आंबा,चिंच,विविध प्रकारचे गवते यासारख्या देशी वृक्षांची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यात येईल ज्या देशांमध्ये या प्रकारची झाडे आहेत तो देश जगात श्रीमंत देश समजला जाणार आहे महादेव जरा वन देवराई हेदेखील अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प समजून पशुपक्ष्यांसाठी विघातक असलेल्या नावाची वनस्पती चे समूळ उच्चाटन करून या ठिकाणी दर्जेदार वृक्षांची लागवड करण्यात येईल सुरुवातीला एप्रिल महिन्यामध्ये देवराई संस्थेचे तज्ञ येऊन या ठिकाणी पाहणी करतील सर्वेक्षण करतील आणि त्यानंतर प्रत्यक्ष काम सुरुवात होणार आहे.बीडसांगवी येथील महादेव दरा या ठिकाणी देवराई च्या माध्यमातून पशुपक्ष्यांसाठी विषारी ठरणाऱ्या ग्लॅरीसिडिया या वनस्पतीचे समूळ उच्चाटन करण्यात येणार असून देशी वृक्ष असलेल्या आंबा चिंच मोठ्या प्रमाणावर झाडांची लागवड करण्यात येणार आहे.

बीडसंगवी येथे माझ्या आग्रहास्तव महादेव दरा शिवारात आलेले प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांच्या कडे मी मागणी करताच देवराईच्या माध्यमातून जवळपास २५ एकरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले जाणारा आहे.याचा वृक्षप्रेमी असल्याने मनस्वी आनंद होत आहे. या देवराई वृक्षारोपण करत प्रभावीपणे अंमलबजावणी करून स्वतः जातीने लक्ष देत जबाबदारीने राबवणार असल्याचे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी यावेळी बोलताना केलेह. भ. प कल्याण कोल्हे महराज सेवा सेवा सोसायटी चेअरमन सुभाष गणगे, रणजीत ढोबळे,मल्हारी करांडे,जालिंदर नरवडे, बाबासाहेब नरवडे, विजय डुकरे, राजु करांडे विजय जाधव सतोष नरवडे, उद्धव नरवडे, ललेश नरवडे, बाबासाहेब शिंदे,जाकीर शेख, रफिक शेख,संजय डुकरे,रामराव पाटील, रामराव शेळके,शहादेव चव्हाण,सोमनाथ घुले, गोकुळ नरवडे, बारकु ढोबळे, कल्याण मोहळकर,आसाराम पाटील, नामदेव जाधव, दादासाहेब साळवे,पोपट करडुळे, महादेव करडुळे, लहु करडुळे, बापुराव गणगे, रामदास गणगे, महादेव गणगे, महादेव शेळके,हिराजी बाबणे आदीसह बीडसांगवी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी स्वत:चीच दुकाने थाटली ?

## निकृष्ट दर्जाच्या निविष्ठा शेतकऱ्यांच्या माथी मारल्याने शेतकरी संकटात आ.सुरेश धस यांचा गंभीर आरोप

आष्टी (प्रतिनिधी)

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातील काही अधिकारी कर्मचाऱ्यांनी बेकायदेशीरपणे नातेवाईक आणि मित्रांच्या नावे कृषी निविष्ठा उत्पादक कंपन्या आणि विक्री केंद्र सुरू केली असून या जबाबदार अधिकाऱ्यांची माहिती आपण मागितली असून या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याची मागणी करणार आहोत अधिकाऱ्यांनी स्वतःच्याच कंपन्या स्थापन करून निकृष्ट दर्जाच्या निमित्त शेतकऱ्यांच्या माती मारल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होऊन शेतकऱ्यांना संकटाला सामोरे जावे लागल्यामुळे शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ आली मात्र अधिकारी मालामाल होण्यासाठी प्रयत्न करत आहेत हे महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैवी आहे त्यामुळे या सर्व अधिकाऱ्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्याची आपण मागणी करणार आहोत असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले आष्टी येथील विशेष पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले,महाराष्ट्रील कृषि क्षेत्र वरचेवर संकटात असल्याने महाराष्ट्रील शेतकरी आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त होत आहे. शेतकरी आत्महत्या करण्याच्या पाठीमागे निकृष्ठ दर्जाची खते, बियाणे, औषधे आणि किटकनाशाके, सूक्ष्म मुलद्रव्ये, प्रजैवके (झत्रठ), झठजच् इत्यादीचा पुरवठा कंपन्या व कृषि विभागातील अधिकारी शेतकऱ्यांच्या माथी मारत आहेत. तसेच कंपन्या निरनिराळे प्रलोभने देऊन शेतकऱ्यांना मुख्य खते (युरीया, डीएपी इत्यादी) सोबत लिंकिंग मध्ये ही निकृष्ठ दर्जाची खते घेण्यास भाग पडत आहेत. त्यासाठी गाव पातळीवरील कृषि निविष्ठा विक्री केंद्रे व कंपनी पातळीवरील विक्री काम पाहणारे किंवा उत्पादन केलेला माल खपविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत आणि शेतकरी कर्ज काढून उत्पन्न जास्त यईल या आशेने या निविष्ठा घेत आहेत, गेल्या १० वर्षा पासून चढत्या क्रमाने बोगस खते, बियाणे, औषधे उत्पदान करणाऱ्या कंपन्यांचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे शेतकरी वर्गाचा उत्पादन खर्च वाढत आहे. हवामान व पावसाचे अनिश्चिततेमुळे अपेक्षित उत्पादन शेतीमधून मिळत नाही उत्पन्न आल्यानंतर त्याचा बाजारात योग्य भाव मिळत नाही, त्यामुळे शेतकरी आत्महत्याचे प्रमाण महाराष्ट्रामध्ये वाढू लागलेले आहे ही एक वस्तुस्थिती आहे.

निकृष्ट दर्जाच्या या खते बियाणे औषधे आणि निविष्ठा उत्पादन करणाऱ्या कंपन्यांवर योग्य दर्जा आणि गुणवत्ता पूर्ण निविष्ठा उत्पादन होणार आहे याचे नियंत्रण करण्याचे मुख्य काम कृषी विभागाचे आहे. एका जिल्ह्यामध्ये कृषी विभागामार्फत गुणनियंत्रणाच्या कामासाठी प्रत्येक तालुक्याला कार्यरत असणारे तालुका कृषी अधिकारी, पंचायत समिती मधील कृषी अधिकारी, उपविभागीय पातळीवर उपविभागीय कृषी अधिकारी, जिल्हा पातळीवर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जिल्ह्यात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या कार्यालयातील कृषी उपसंचालक व पूर्णवेळ जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा परिषदेकडील कृषी विकास अधिकारी आणि जिल्हा परिषदेकडील मोहीम अधिकारी, विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयातील विभागीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, विभागीय तंत्र अधिकारी गुन नियंत्रण इत्यादी अधिकारी कर्मचारी काम करीत आहेत.

साधारणपणे आमच्या बीड जिल्ह्यामध्ये एकूण ११ तालुके आहेत. त्यामध्ये ११ तालुका कृषी अधिकारी, ११ पंचायत समितीचे कृषी अधिकारी, ३ उपविभागीय कृषी अधिकारी, जिल्हा परिषदेचे मोहीम अधिकारी, कृषी विकास अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, त्यांच्या कार्यालयातील कृषी उपसंचालक आणि पूर्णवेळ जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक असे मिळून सुमारे ३० एकट्या बीड जिल्ह्यात क्वालिटी कंट्रोल इन्स्पेक्टर म्हणून कार्यरत आहेत. विभागीय कृषी सहसंचालक छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील तंत्र अधिकारी गुणनियंत्रण, विभागीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक हे सुद्धा क्वालिटी कंट्रोल इन्स्पेक्टर आहेत.

या सर्वांनी बदली करीता मंत्री कार्यालयात मोठ्या प्रमाणात रकमा देऊन बदली करून घेतली असल्याने ३ वर्षात १० पट रक्कम वसूल करण्याचा हेतूने हे सर्व



क्वालिटी कंट्रोल इन्स्पेक्टर स्वतःचे काम सोडून आणि शेतकऱ्याला गुणवत्ता पूर्ण निविष्ठा पुरवठा करण्यासाठी निरीक्षण करण्याचे सोडून हप्ते गोळा करण्यामध्ये गुंतलेले असतात. विक्री केंद्रे तपासणीला गेल्यावर तपासणी फी, नमुना काढल्यास त्याची फी वेगळी असते, या सर्व हप्तेखोरपणामुळे कृषी निविष्ठा विक्री केंद्राचे मालक शेतकऱ्याला देण्यात येणाऱ्या निविष्ठाच्या किमतीपेक्षा जास्तीचे कमिशन (४०% ते ५०%) मिळविण्याच्या हेतूने बोगस कंपन्यांचा माल खपविण्याकडे त्यांचा कल जास्त असतो. त्यामुळे शेतकऱ्यांना गुणवत्ता पूर्ण निविष्ठा मिळत नाहीत.

याबाबत मी माहिती घेतली असता बहुतांश अधिकारी म्हणजेच संचालकापासून ते जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकापर्यंत या अधिकाऱ्यांचे बोगस निविष्ठा उत्पादन करणाऱ्या कंपन्यांमध्ये त्यांचा वाटा आहे किंवा त्याच्या रक्तातले नातेवाईक म्हणजेच अप्रत्यक्षरीत्या स्वतःच्याच कंपन्या स्थापन करून त्या कंपन्यांमधला माल याच कृषी विक्री केंद्रांस घेण्यास दबाव आणतात व मोठ्या कंपन्यांच्या गुणवत्ता पूर्ण निविष्ठासोवत या बोगस निविष्ठा लिंकिंग मध्ये विकण्याची बळजबरी केली जाते.

खात्यातील अधिकाऱ्यांनीच कंपन्या सुरू केलेल्या असल्यामुळे, या कंपन्यांमार्फत उत्पादित झालेल्या खते, बियाणे, औषधे, कीटकनाशके इत्यादींचे नमुने काढले जात नाहीत. कृषि निविष्ठा विक्री केंद्रांना अधिकाऱ्यांच्या अप्रत्यक्षरीत्या मालकीच्या असणाऱ्या कंपन्या मार्फतच उत्पादित झालेल्या निविष्ठांचा माल विकत घेण्यासाठी जबरदस्ती केली जाते.

कोल्हापूर संभागातील विभागीय कृषि सहसंचालक उमेश पाटील यांनी त्यांच्या पत्नी आणि मुलाच्या नावे कृषि सेवा बायो ऑरगॅनिक फर्टीलायझर प्रायव्हेट लिमिटेड या नावाची कंपनी स्थापन केलेली आहे. महाराष्ट्र राज्यातील माझ्याकडे मंत्रालयातून आलेल्या तक्रारीतून महाराष्ट्रातून परवाना घेण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक कंपनीकडून कलेक्शन किरण जाधव कडे केले जात असल्याचे समजले किरण जाधव याने तंत्र अधिकारी निविष्ठा व गुणनियंत्रण विभागात गेल्या १५ वर्षा पेक्षा जास्त काळ गुणनियंत्रण विभागातच काम केले आहे.

कृषी विभागातील अधिकारी आणि कर्मचारी स्वतःच खते, बियाणे आणि कीटकनाशके यासारख्या कृषी उत्पादनांशी संबंधित कंपन्या स्थापन करून चालवत असल्याचे उघड झाले आहे. पुण्यात हडपसर, वडकी नाला तसेच परिसरात तसेच नाशिक मधील एमआयडीसी, औरंगाबाद एमआयडीसी, ठाणे जेएनपीटी चा जवळचा एरिया मध्ये अधिकाऱ्यांनी गोडाऊन बांधलेली आहेत. हीच गोडाऊन ते २० ते ३० रुपये स्क्वेअर फिटने भाड्याने देत आहेत. स्वतःचे गोडाऊन मध्ये या बोगस कंपन्यांचा माल साठवून विक्री करत आहेत. अशा प्रकारच्या कृत्यांमुळे केवळ कृषी विभागाची प्रतिष्ठा डागाळली जात नाही, तर शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे आणि भ्रष्टाचाराला खतपाणी मिळत आहे. या प्रकरणात 'प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉन्डरिंग कायदा, २००२ (झचङ-)* अंतर्गत हे अधिकारी आणि कर्मचारी दोषी ठरूतात, कारण काळा पैसा यात गुंतवला आहे. त्याला शासनाची मंजुरी घेतलेली नाही. सरकारी खरेदी प्रक्रियेत स्वतःच्या कंपन्यांना प्राधान्य देण्यासाठी नियमांचे उल्लंघन केले जाते. शेतकऱ्यांसाठी असलेली सबसिडी स्वतःच्या कंपन्यांना मिळवून देण्यासाठी बनावट कागदपत्रांचा वापर होतो, स्वतःच्या कंपन्यांमार्फत निकृष्ट दर्जाची खते, बियाणे आणि औषधे शेतकऱ्यांना पुरवून त्यांचे नुकसान करणे, या व्यवसायातून मिळणारा नफा हा कायदेशीर मार्गाने दाखवला जात नाही, तर तो काळ्या पैशाच्या स्वरूपात जमा केला जातो.

या सगळ्या अधिकाऱ्यांनी प्रचंड भ्रष्टाचार करून कित्येक कंपन्यांसोबत भागीदारी करून निकृष्ठ निविष्ठांच्या नावावर कित्येक कोटी रुपये भ्रष्टाचारी मार्गाने कमविले आहेत. एकट्या किरण जाधव च्या काळात हजारो परवाने साताऱ्या जिल्ह्यात वाटप केले आहेत. त्यात निविष्ठा उत्पादन, निविष्ठा विक्री केंद्रे यांचा समावेश आहे. त्यात स्वतः किरण जाधव जाधव यांचे मित्र आणि नातेवाईक यांचा समावेश आहे. आता किरण जाधव सध्या महाराष्ट्र राज्याच्या दक्षता पथकाचे प्रमुख म्हणून काम करत आहे. दक्षता पथकात गेल्यावर सुद्धा किरण जाधवने सहा महिन्यात ५ कोटी रुपयांचा कलेक्शन केलेले आहे. किरण जाधव नावाच्या या भ्रष्टाचारी अधिकाऱ्याने गुणनियंत्रण विभाग पोखरून काढलेला या भ्रष्टाचारी लोकांनी मंत्र्यापासून तालुका कृषी अधिकाऱ्यापर्यंत टक्केवारी देऊन यांच्या बोगस कंपनीत उत्पादित होणाऱ्या बोगस निविष्ठा वाटप करून त्यातून कोट्यावधी रुपये कमवितात. या सर्व लोकांची बँक स्टेटमेंट ची माहिती घेतल्यास यांचा सगळा भ्रष्टाचारी मार्गाने कमवलेला काळा पैसा उघड होईल..

कृषी विभागातील अधिकाऱ्यांच्या कर्मचाऱ्यांच्या नावाने असणाऱ्या कंपन्यांचा तपशील असा आहे की किरण शामराव जाधव कृषी आयुक्तालयात तंत्र अधिकारी गुणनियंत्रण ७- ८ मध्ये ज्या खत उत्पादक कंपन्यांना परवाने दिलेले आहेत व परवान्यांना नूतनीकरण दिलेले आहे. त्या सर्व कंपन्यांचे प्रशासकीय, तांत्रिक व आर्थिक लेखा परीक्षण करण्यात यावे.

उल्लेख केलेल्या कंपन्यांची व विक्री केंद्रांची तपासणी आयकर विभागामार्फत सखोल तपासण्या करण्यात याव्या व या अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची चौकशी उघड चौकशी महासंचालक लाच लुचपत प्रतिबंधक विभाग मार्फत करण्यात यावी.

# भवानी अर्बन बँकेला १४३.२३ लक्ष रुपयांचा नफा

## माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्याकडून संचालक मंडळाचे कौतुक

गेवराई ।प्रतिनिधी

भवानी अर्बन को.ऑप.बँक लि, गेवराई या बँकेला सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात करपूर्व १४३.२३ लक्ष रुपयांचा नफा झालेला आहे. बँकेने या आर्थिक वर्षात डिजिटल आर्थिक व्यवहारावर लक्ष केंद्रीत केले आहे. एटीएम सुविधेसह डेबिट कार्ड, मोबाईल बँकिंग, आयएमपीएस, युपीआय, आधार पेमेंट, नॅच (डीबीटी) आदी सुविधा बँकेच्या ग्राहकांना उपलब्ध करून दिल्या आहेत. माजी आ.अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली सचोटीने पारदर्शक कारभार केल्यामुळे बँकेने ग्राहकांमध्ये विश्वासार्हता निर्माण केली आहे. बँकेला या आर्थिक वर्षात मिळालेल्या यशाबद्दल माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांनी संचालक मंडळाचे कौतुक केले आहे.



भवानी अर्बन को.ऑप.बँक लि, गेवराई या बँकेला सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात करपूर्व १४३.२३ लक्ष रुपयांचा नफा झालेला आहे. बँकेचे भागभांडवल २ कोटी ७६ लक्ष आहे. बँकेचा स्वनिधी ६८६.६७ लक्ष रुपये असून मार्च २०२५ अखेर एकुण ठेवी ७० कोटी ९२ लक्ष रुपये आहेत. बँकेने ३४ कोटी ४८ लक्ष रुपयांचे कर्ज वितरण केले असून ३४ कोटी ९७ लक्ष रुपये बँकेची गुंतवणुक आहे, यापैकी २९ कोटी ७२ लक्ष रुपये सरकारी रोख्यात बँकेने गुंतविले आहेत. बँकेचे खेळते भांडवल ८३६०.०५ लक्ष रुपये आहे, बँकेचे ढोबळ अनुउत्पादीत कर्जाचे प्रमाण १.११% असून बँकेचा नेट एनपीए ०.७०% असल्याची माहिती बँकेचे चेअरमन बप्पासाहेब मोटे यांनी दिली.

बँकेला मिळालेल्या यशाबद्दल माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांनी संचालक मंडळाचे कौतुक केले. याप्रसंगी बँकेचे चेअरमन बप्पासाहेब मोटे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर चव्हाण, बप्पासाहेब जाधव, रघुनाथ मोहोळकर, बँकेचे सरव्यवस्थापक भाऊसाहेब नागरे, बीड शाखेचे व्यवस्थापक प्रकाश आमलेकर, माजलगाव शाखेचे व्यवस्थापक मनोज डावकर यांच्यासह बँक कर्मचारी व सभासद उपस्थित होते.

# सतीश भोसले उर्फ खोक्या प्रकरणातून मला व्हिलन ठरवून माझ्या खुनाचा कट रचण्यात आला होता

आ.सुरेशधस यांचा गंभीर आरोप

आष्टी ।प्रतिनिधी

सतीश भोसले उर्फ खोक्या याच्या प्रकरणातून माझी राजकीय कारकीर्द धोक्यात आणून प्रसंगी हरणाच्या शिकारी बाबत विपरीस्थ वक्तव्य करून विष्णूई समाजाच्या समोर मला विलन ठरवून माझ्या कोणाचा कट रचण्यात आला होता असा गंभीर आरोप आमदार सुरेश धस यांनी केला आहे आष्टी येथे पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते बीड जिल्ह्यातील काही बिनकामी जनमानसातून बाद झालेले पुढारी एकत्रित येऊन माझ्या बदनामीसाठी प्रयत्न करत होते त्यातच सतीश भोसले उर्फ खोक्या याच्या कारवाईमुळे चर्चा सुरू झाली आणि माझ्या बदनामीचा आणि त्यातून माझ्या हत्येचा कट सचण्यात आला कारण काळवीट आणि हरियाण हे वैष्णवी समाजाचे दैवत समजले जाते या हरणाच्या शिकारी बाबत सतीश भोसले यांच्यावर गुन्हा दाखल झाला असून त्याला अटक करण्यात आली आहे त्याबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना काही महाभागांनी

सतीश भोसले हा आदिवासी समाजातील असून हरिणाची शिकार करून सुरेश धस यांना पुरवतो, असे बिष्णोई समाजाला सांगण्यात आले होते त्यातून बिश्नोई समाजा समोर मला विलन ठरवण्याचा प्रयत्न झाला आणि त्यातून माझा खून करण्यासाठी या समाजातील काही व्यक्तींना राजस्थानवरून विमानाने मुंबईत आणण्यात आले होते. मला मारण्यासाठीच मुंबईत आणले असल्याचा दावा सुरेश धस यांनी केला आहे.

आष्टी येथील औव्दैतचंद्र निवासस्थानी मंगळवार (दि.१)रोजी सायंकाळी ५ वा.आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत आ.धस बोलत होते.यावेळी ते पुढे बोलतांना आ.धस म्हणाले,जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण उचलून धरले होते.या संपूर्ण प्रकरणात राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. यामुळेच मंत्री धनंजय मुंडे यांना देखील राजीनामा द्यावा लागला आहे.या सर्व घटनांदरम्यान सतीश भोसले उर्फ खोक्या भोसले या सुरेश धस यांच्या कार्यकर्त्यांवर देखील अनेक गंभीर आरोप करण्यात आले आहेत.सतीश भोसलेला अटक देखील करण्यात आली.सतीश भोसले हा हरिणाची शिकार करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.या माध्यमातून आपल्याला जिवे मारण्याचा कट रचण्यात आला होता, असा आरोप सुरेश धस यांनी केला आहे.सतीश भोसले उर्फ खोक्या याच्या माध्यमातून सुरेश धस हे हरणांचे मांस खात असल्याचे पसरवण्यात आले.बिष्णोई समाजाला सुरेश धस यांना हरणाचे मास कसे पुरवले जात होते, हे पटवून सांगण्यात येत होते असे देखील सुरेश धस यांनी म्हटले आहे ते पुढे म्हणाले, इतक्या खालच्या दर्जाचे राजकारण बीडमध्ये जे सुरू आहे ते योग्य नाही. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया आणि तृप्ती देसाई यांना इथल्या खाचा-खोचा माहिती नाहीत. त्या काही पण बोलतात.खोक्याच्या प्रकरणात हे अडचणीत..अरे कशाचे अडचणीत? माझा काय संबंध त्याच्याशी? तो त्याचा शिक्षा भोगत आहे.त्याच्याशी माझा काहीही संबंध नाही परळीचा राजकारणात बाद ठरलेले बिनकामी पुढारी आष्टी मतदार संघात बोलवून त्यांच्या तोंडून माझी बदनामी करण्याचे षडयंत्र देखील रचण्यात आले होते या सर्व प्रकरणाचे योग्य वेळी योग्य ठिकाणी मी पुरावे सादर करीन आणि याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांकडे रीतसर तक्रार करणार आहे असेही ते शेवटी म्हणाले

शिवमंदिर प्राण-प्रतिष्ठा,कलशारोहण सोहळ्यानिमित्त आयोजित

# आयोध्या निवासी प.पू.श्री. राघवशरण महाराज यांच्या अमृतवाणीतून श्रीराम कथेला प्रारंभ


बीड (प्रतिनिधी)


शिवमंदिर प्राण- प्रतिष्ठा तथा कलशारोहण सोहळा गुरुवार दि. तीन एप्रिल २०२५ रोजी ह.भ.प.श्री. शांतिब्रह्म नवनाथ बाबा यांच्या शुभहस्ते संपन्न होत असून यानिमित्ताने चैत्र नवरात्रीचे औचित्य साधून श्रीराम जन्मोत्सव या पावपरवा निमित्ताने रविवार दि. ३० मार्च ते सोमवार दि.०७ एप्रिल २०२५ दरम्यान परमपूज्य राघवशरणजी महाराज (आयोध्या निवासी) यांच्या अमृतवाणीतून भव्यदिव्य श्रीराम कथा महोत्सव दुपारी ०३.३० ते सायं सात दरम्यान होंडा रोड भागातील रविराज मंगल कार्यालय, एमआयडीसी रोड बीड येथे संपन्न होत असून कथेच्या प्रथम दिनी मंगलाचरण, द्वितीय दिनी विवाह सोहळा, तृतीयदिनी श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला तर बुधवारी चतुर्थदिनी यज्ञ रक्षा- नगर दर्शन, गुरुवार पंचमदिनी श्री राम विवाह सोहळा, शुक्रवारी शष्टमधील श्रीराम वन गमन केवट प्रसंग, शनिवारी सप्तमदीने भरत चरित्र, रविवार अष्टमदिनी श्री हनुमंत चरित्र, सोमवारी नवामदिनी श्रीराम राज्याभिषेक




सोहळा थाटात संपन्न होत असून या कार्यक्रमाचे आयोजक श्री हनुमानजी महाराज एवम समस्त माऊली भक्तगण बीड- महाराष्ट्र हे असून कथेचे मुख्य यजमान जोशी परिवार पटेल बंधू, मंगेश दिनकरराव कुलकर्णी हे भूषवीत असून कथेच्या सांगतेला सोमवारी दुपारी एक ते तीन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून भाविकभक्तांनी कथा श्रवणासह कथेच्या सांगतेला संपन्न होत असलेल्या महाप्रसादास मोठ्या संख्येने सहपरिवार उपस्थित रहावे असे आवाहन कथेचे यजमान जोशी परिवार पटेल बंधू व मंगेश दिनकर कुलकर्णी यांच्यासह परिसरातील भाविकांनी केले आहे.

# कै. गणपतराव गुट्टे प्रा. माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय आणि श्री वैधनाथ आय टी आय मध्ये आरोग्य शिबीर संपन्न








परळी (प्रतिनिधी)

याबाबत सविस्तर माहिती अशी की तालुक्यातील हाळम येथे संस्थेचे अध्यक्ष मा. माधव मुंडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली,कै. गणपतराव गुट्टे प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि श्री वैधनाथ आय टी आय मध्ये आरोग्य शिबीर संपन्न झाला..या वेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत आपल्या आरोग्याची तपासणी करून घेतली .या वेळी डॉ.म्हणून धर्मापुरी आरोग्य विभाग चे तज्ञ म्हणून डॉ.घोबाळे सर व आरोग्य सेवक म्हणून बालाजी शिंदे सर यांच्या नेतृत्वाखाली शाळेतील व आय टी आय.कॉलेज च्या विद्यार्थ्यांची तपासणी झाली होती. या मध्ये विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक माहिती देत औषध उपचार करण्यात आले होते. शिबिरप्रसंगी शिबिर अध्यक्ष म्हणून माधव मुंडे सर,माणिकराव दहिफळे,सुधाकर गित्ते, विष्णू दहिफळे ,सर्वश्री ज्ञानेश्वरी फड मॅडम,आय टी आय चे प्रिंसीपल सोमेश मुंडे सर ,के.जी.जी स्कुल चे प्रिंसीपल नवल वर्मा सर ,गोविंद दहिफळे सर या वेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रम सुत्रसंचलन संध्या चव्हाण मॅडम आणि केले व आलेल्या पाहुण्यांचे आभार सर्व स्टाफ ने मानत शिबीर संपन्न केला.शिबीर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी ज्ञानेश्वरी फड मॅडम सोमेश मुंडे सर,नवलकुमार वर्मा सर,,संध्या चव्हाण मॅडम, प्रदीप पिंपळे सर,गोविंद दहिफळे सर,सुजित हाके सर ,करुणा वाघमारे मॅडम,राहुल पंडित सर, आरती फड मॅडम,वैष्णवी दहिफळे मॅडम,सुमन सरवदे मॅडम,स्वप्नालीआव्हाड मॅडम,श्रीकृष्ण मुंडे सर, नागनाथ कातकडे सर,अमोल कातकडे सर, प्रतीक्षा मेंगले मॅडम,अक्षता मुंडे मॅडम, वसंत होळंबे , हरिचंद्र मुंडे.शोभा मुंडे,सोनाली मुसळे,सोमेश्वर गुट्टे,,लहू गुट्टे ,बाबुराव केंद्रे..



# सी. बी. एस. ई माध्यमाची गुढी उभारून राजस्थानी शाळेत इ. १ लीची नवीन बॅच सुरू

बीड ।प्रतिनिधी

सतत नाविन्याचा ध्यास घेऊन कार्य करणाऱ्या सन १९६६ पासून शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून हजारो विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडवणाऱ्या मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयात आज नवीन शैक्षणिक धोरणानुसार सि. बी. एस. ई माध्यमाची इ.१ ली वर्गाची सुरुवात करण्यात आली.

आकर्षक सजावट , नयनरम्य रांगोळी , सि. बी. एस. ई. ची गुढी , सेल्फी पॉईंट,मुलांना गिफ्ट विद्यार्थ्यांचे स्वागत या सर्व तयारीसह नव्या बॅचचे स्वागत करण्यात आले.राजस्थानी सेवा समाज या संस्थेचे अध्यक्ष विष्णुदास तापडिया, सचिव रामेश्वर कासट यांच्या विशेष उपस्थितीत तसेच माध्यमिक विभागाचे प्राचार्य कसबे सर , उपमुख्याध्यापक लाहोटी सर , पर्यवेक्षक हावळे सर यांच्या उपस्थितीत सरस्वती पूजन करून विद्यार्थ्यांचे टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. मुलांना पेन्सील, इरेझर गुलाबाचे फुल भेट स्वरूपात देण्यात आले.मुलांनी व पालकांनी स्वागत सोहळ्याचा मनापासून स्वीकार करत सेल्फी व फोटोजचा ही आनंद घेतला. शाळेचे मुख्याध्यापक गिरीश सोहनी यांच्या मार्गदर्शनात तोष्णीवाल , गांधी , लड्डा , बोरा , दोडे , उबाळे ,मंत्री , पारीख सौ. जाजू , बियाळे , ढेपे , जाधव , गरुड , लोणकर , नलवडे , भल्ला , कोठी , केदारी , माने , पोहेकर , सराफ , तोडकर , खोड यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन केले. अजीजपुरा केंद्राच्या केंद्रप्रमुख सौ. माया सोनवणे मॅडम , गटशिक्षणाधिकारी श्री. समदंर खान सर , प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी श्री. भगवान फुलारी सर यांच्या मार्गदर्शन पर सूचनेनुसार तसेच नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी या उद्देशाने राजस्थानी शाळेने पुढाकार घेऊन बीड जिल्ह्यात सर्व प्रथम या वर्गाचे आयोजन केले आहे . शाळेच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल पालकांनी कौतुक व्यक्त